अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. ४ मे २०२३ | वर्ष : २१ वे ▸ अंक : २१४ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८



# गृहकलह...

सत्ता आणि संपत्तीवरून घराघरामध्ये वाद उत्पन्न होणे हे काही नवीन नाही.अगदी राजघराण्यातील राजेही त्यातून सुटले नाहीत.सत्ता आणि संपत्तीचा हव्यास अगदी पुरातन कालापासून चालत आला आहे.तेव्हा आजची स्थिती त्याला कशी अपवाद असू शकते.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अध्यक्षपदावरून जो वाद पेटला आहे,तो सत्ता-संपत्तीचाच आहे,यात शंका नाही.राज्याच्या समाजकारणात आणि राजकारणात गेली सहा दशके ज्यांनी बारामतीचा लौकिक निर्माण केला,शेकडो नेते तयार करून त्यांना राजवैभव प्राप्त करून दिले असे ते शरद पवार.राष्ट्रवादी काँग्रेसची त्यांनी स्थापना केली.राज्यात या पक्षाचे मूळ घट्ट धरून आहे.राज्यात ज्या अनेक सहकारी संस्था आहेत,त्यावर पवार व त्यांच्या शिष्यांचीच पकड आहे.अधून मधून राज्याची सत्ता मिळत असते.बारामतीत तर औद्योगिक आणि कृषीचे मोठे वैभव आहे.पवारांचे वासरदार कोण? हा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून निरूत्तर आहे पण त्याचे उत्तर देण्याची वेळ आज येवून ठेपलीय.अध्यक्षपद सोडण्याचा निर्णय पवारांनी जाहीर केल्यानंतर पक्षात वादळ उठले.नुसते वादळ नाही तर यादवीच म्हणा की.अध्यक्षपद सोडू नका म्हणून अनेक नेत्यांनी पवारांचे कार्यक्रमाच्या ठिकाणीच पाय धरले तर काहींनी ढसाढसा रडून आपल्या नेत्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली.कार्यकर्ते तर पवारांच्या गाडीसमोर आडवे झाले.नेत्याविषयी हा आदरभाव असू शकतो.संपूर्ण चित्र



पवारांच्या भोवती एकवटलेले असताना मात्र पवारांचे पुतणे असलेले अजितदादा एकीकडे होते.अजितदादांनी पद सोडण्याच्या निर्णयाचे समर्थन करणे म्हणजे त्यांच्या मनात जे आहे,ते घडते आहे,असा त्याचा अर्थ निघतो.त्यात गैर काय?राष्ट्रवादीची सध्याची स्थिती पाहिल्यानंतर पक्षावर अजितदादांचेच वर्चस्व आहे.पवारांच्या कन्या सुप्रिया सुळे ह्या स्थानिक पातळीवरच्या राजकारणात फारशा सक्रीय नाहीत. सुप्रिया ह्या अजितदादांपेक्षा लहान आहेत.पक्षात उगीच हस्तक्षेप नको वा नसत्या वादाला आमंत्रण नको म्हणून कदाचित त्या लांब राहिल्या असतील. अशीच त्यांची भूमिका असेल तर ती व्यवहाराला धरून आहे, असे म्हणावे लागेल.आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांना अजितदादांनी झापले.सुप्रियांना त्यांनी बोलू दिले नाही.या प्रसंगात पवारांच्या पत्नी प्रतिभाकाकींची भूमिका मात्र एकदम कडक दिसून आली.साहेब आता माघार घ्यायचीच नाही,असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. एकंदरीत हे चित्र पाहात पवार फॅमिलीत गृहकलह आहे हे स्पष्टपणे जाणवले.कारण पवारांचा उत्तराधिकारी अजितदादांना व्हायचे आहे तर घराण्याची राजकीय गादी अजितदादांना न देता आपली कन्या सुप्रिया यांना देण्याचा पवारांचा मानस असावा.बुधवारी पक्षात बरीच खलबते झाली.पक्षातील एका गटाने सुप्रिया यांचे नाव लावून धरलेले असावे.कारण कार्याध्यक्ष म्हणून त्यांचे नाव पुढे आले आहे.मात्र अजितदादांना हा फार्म्युला मान्य आहे काय? हे येत्या काळात दिसेलच.संपूर्ण पक्ष अजितदादांच्या हाती जावू नये म्हणून एक गट गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत आहे.राष्ट्रवादीची स्थापना झाल्यानंतर जे जे नेते पवारांच्या सोबत गेले,त्यांना अजितदादा नको आहेत.कारण त्यांचा स्वभाव त्यांना माहीत आहे.अजितदादांच्या नेचरमुळे अनेक नेत्यांनी राष्ट्रवादी पक्ष सोडला तर काहीजण सोडण्याच्या मनस्थितीत आहेत.तरूण आमदार मात्र अजितदादांच्या सोबत आहेत.गेल्या आठवड्यात राजकीय क्षेत्रात एक वावटळ उठली होती.अजितदादा हे ४० आमदार घेवून भाजपच्या आश्रयाला जाणार,अशी ती बातमी होती.अजितदादांनी त्याचा इन्कार केला असला तरी पडद्याआड राहून राजकारणात अशी कारस्थाने होतच असतात.अजितदादांच्या कारस्थानांवर पवारांची करडी नजर नाही,असे होवूच शकणार नाही.अजितदादांच्या हाती पक्ष दिला तर काय होईल? ही चिंता पवारांना लागून असावी.त्यापेक्षा कन्याला गादी देवून टाकली तर पक्ष टिकेल,असे पवारांना मनोमन वाटत असावे.मुळात शिवसेनेशी आघाडी केली हे अजितदादांना मान्य नाही.पवार हे आघाडीतून बाहेर पडायला तयार नाहीत.आघाडीत राहून उद्धव ठाकरे हे वरचढ होवू पहात आहेत.आघाडीत चर्चेची बैठक जेव्हा होते,तेव्हा पवारांच्या शेजारी ठाकरेंना मान असतो.वज्रमूठ सभेत ठाकरेंना सिंहासनासारखी खुर्ची असते. ह्या साऱ्या बाबी अजितदादांना खुपत आहेत,यात शंकाच नाही.एकतर आघाडीतून पवारांनी बाहेर पडावे किंवा पक्ष आपल्या ताब्यात द्यावा,असा अजितदादांचा प्लॅन दिसतो.घराण्यातील गादी देण्या-घेण्याच्या कारणावरून ठाकरे फॅमिलीतही असाच गृहकलह झाला होता.पुतण्या राजकडे क्वालिटी असताना शिवसेनाप्रमुखांना पुत्रप्रेम जवळचे वाटले तसे आता पवारांना कन्याप्रेम जवळचे वाटत असणार.सृष्टीचा हा खेळ आहे.

---

सामाजिक

# 'वास्तव' जगणारी तरुणाई!

**विज्ञानाच्या भरारीनं सारं जग आज आपल्या मुठ्ठी में' आहे हे खरं आहे, पण बाहेरचं जग आत घेताना एक आतलंही जग असतं हे विसरून कसं चालेल? विज्ञान कसं काबूत ठेवायचं याचं एक अंतर्विज्ञान असतं, आज ते जाणून न घेता आपण फक्त मनोरंजनाचं एक साधन म्हणूनच या माध्यमांकडे पाहत आहोत, पण दुसऱ्याचे खेळ, गाणी, नृत्य, विनोद पाहताना आपला स्वतःच्या जडणघडणीचा वेळ किती वाया जात आहे याचं भान ज्या युवकाला आहे तोच युवक पुढच्या कालप्रवाहात तग धरून असेल. मग मोबाईल, कॉम्प्युटर, यू ट्यूब, फेसबुक यात किती गुंतायचे हे आपणच साक्षेपाने म्हणजेच सारासार विचाराने ठरवायचे असते.**




कारण तारुण्याचा काळ म्हणजे भविष्याची तयारी वर्तमानात करण्याचा काळ असतो आणि जो या वर्तमानात गाफिल राहिला त्याला मुळींच भविष्य नसतं आणि कालांतराने याचं कारण तो स्वतःचं बनलेला असतो. जीवनात माणसाने विशेषतः तरुणाईने पोटापाण्यासाठी पैसा जरूर कमवावा, पण त्याचबरोबर जीवनात आनंदाची वीणा झंकारणेदेखील महत्त्वाचे असते. शेवटी माणसाची श्रीमंती ही नदीसारखी असावी लागते. कारण तिला समाजाचे देणे देण्याची वृत्ती लागते. ज्ञानेश्वर माऊलींनी नाही का पसायदान मागितले त्यात स्वतःसाठी काहीही मागितले नाही. जे जगासाठी तेच स्वतःसाठी' हे माऊलींनी जाणले. मग आपण त्याचं प्रकाशमार्गातील एक पथिक आहोत ना. काही महिन्यांपूर्वी जगविख्यात फोर्ब्जची सामाजिक कार्य, उद्यमशीलता या श्रेणीत विशेष कार्य करणाऱ्या तिशीच्या आतील भारतीय प्रभावी तरुण व्यक्तिमत्त्वांची यादी प्रसिध्द करण्यात आली आणि त्यात विदर्भातील जिजाऊंचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बुलढाणा जिल्ह्यातील आडवळणावरील पिंपळी खंदारे या छोट्याशा गावातील राजू केंद्रे' हा मोठ्या स्वप्नांचा ध्येयवेडा माणूस मोठ्या कर्तृत्व गुणांनी पास झाला आणि एका शेतकरी, कष्टकरी बापाची मान अभिमानाने उंचावली.

खरंतर ब्रिटिश सरकारची चेवनिंग स्कॉलरशिप घेऊन लंडनमध्ये शिक्षण पूर्ण करणाऱ्या राजूची पार्श्वभूमी अशिक्षित आईवडील आणि भटक्या समाजाची होती. मग शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर जिल्हाधिकारी व्हावे हे स्वप्न घेऊन राजू पुढील शिक्षणासाठी पुण्याला पोहचला, मात्र त्याला त्या वेळेस ना वसतिगृह मिळाले ना प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या कुठल्या महाविद्यालयात प्रवेश मिळाला. मग मुक्त विद्यापीठात प्रवेश घेऊन राजूने आपले स्वतःचे पुढील शिक्षण पूर्ण केले, पण आपल्या वाट्याला आलेला संघर्ष इतरांच्या वाट्याला येऊ नये, तांड्यात, वाड्यात, झोपडपट्टीतल्या प्रतिभावंतांना योग्य मार्ग मिळावा यासाठी मग राजूने मोठ्या मनाने एकलव्य' या सामाजिक संस्थेची स्थापना केली आणि २०१२ ला मुक्त विद्यापीठात शिकत असतानाच मेळघाटातील आदिवासी भागात जाऊन त्याचे विचार आणि संस्थेची माहिती सगळ्यांपर्यंत पुरेपूर पोहचवली.

इतकेच नव्हे तर राजूने पुणे, ठाणे, औरंगाबाद, यवतमाळ, अमरावती, मुंबई आदी ठिकाणांहून तब्बल ३० हजारांहून अधिक पुस्तके गोळा केली आणि ती ग्रामीण भागात ग्रंथालय उभारण्याकरिता वितरितदेखील केली. राजूच्या या उत्तुंग कर्तृत्वाची दखल मग फोर्ब्जसारख्या जगविख्यात प्रकाशनालासुद्धा शंभर टक्के घ्यावीच लागली. सध्या चंद्रपूर आणि परिसरात तरुणाईच्या पहल'ची चर्चादेखील आहे. वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिक्षणाची सुविधा, माहिती पोहचण्यास अडचण असलेल्या गोरगरीब कुटुंबातील ११वी, १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत नीट' परीक्षेचे मार्गदर्शन केंद्रदेखील सुरू केले आहे. या विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या पहल' उपक्रमातील सहा विद्यार्थ्यांनी नीट' परीक्षा उत्तीर्णदेखील केली आहे. त्यातील तीन विद्यार्थ्यांचा एमबीबीएसला, दोघांचा पशुवैद्यकीय अभ्यासक्रमाला, तर एकाचा डी. फार्मला प्रवेश झाला आहे.

पहल-रास्ता उम्मीद का' हा उपक्रम धनाढ्य, आवश्यकता पूर्ण होऊन प्रसिद्धीसाठी काम करणाऱ्यांनी सुरू केला नाही, तर सामाजिक जाणिवेतून गोरगरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळावी, महागडे असणारे शिक्षण मोफत मिळावे, प्रतिभावंत शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात यावे या हेतूने शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनीच हा उपक्रम सुरू केला आहे. या विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांना मिळालेले यश निश्चितच प्रेरणादायी आहे. अकोला जिल्ह्यातील टिटवा पारधी बेड्यावरील साहेबराव राठोड आणि मंगेश पवार ही दोन नावेदेखील सध्या चर्चेत आहेत. या दोन तरुणांनी गावापासून तीन किमी अंतरावर अक्षरभूमी' या नावाने शाळादेखील सुरू केली आहे.

दोघांचेही ध्येय एकच आहे. गावातील पारधी समाजाची मुले शिक्षणाच्या मूळ प्रवाहात यावी हाच त्यांचा तीन वर्षांपासून सातत्याने प्रयत्न सुरू होता. खरंतर या प्रवासात त्यांनी सुरुवातीला गावात असलेल्या सभागृहाचा वापर केला, मात्र काहींनी त्यांना सभागृह वापरायला मनाई केली. मग संकट आल्यावर थांबेल ती तरुणाई कसली' ही उक्ती या दोघांनी त्यावेळेस जपली. खऱ्या अर्थाने सार्थदेखील ठरवली आणि गावातल्या माळरानावर विद्यार्थ्यांसह श्रमदान करून बांबू, कामट्यांची शाळा शेवटी उभी केली. यासाठी त्यांनी जीवाची पदरमोडही केली. शिक्षणाची गंगा पारधी बेड्यापर्यंत पोहचविण्याचा ध्यास घेतलेल्या या दोघांनीही टिटवा पारधी बेड्यावर अक्षरभूमी' नावाची समाजाच्या हिताची गंगा अखेर उभारली. तुम्हाला सांगतो आता या ठिकाणी किमान माणसाने तरी माणसाशी माणसासमान वागणे' या प्रार्थनेचे स्वर नवचैतन्याने घुमायला लागले आहेत. विदर्भाच्या तीन जिल्ह्यांतील ही तीन उदाहरणं खरंच तरुणांची वाटचाल स्पष्ट करण्यास पुरेशी आहेत.

तीनही पात्रातील तरुणांनी वेगवेगळ्या संकटांवर मात केली आहे, मात्र या तीनही उदाहरणातील तरुणांचा परस्परांशी परिचय, संवाद नसला तरी या सर्वांचे जगण्याचं मर्म आणि ध्येय समान आहे. आजची बरीच तरुणाई भौतिक सुखाच्या आहारी जात आहे. तरुणाईला खऱ्या अर्थाने जगणं माहीत नाही, असं सतत म्हणणाऱ्यांच्या डोळ्यांत अंजन घालणारी ही तीच तीन उदाहरणं आहेत. शेवटी या तरुणांनी घेतलेल्या पुढाकाराची शासनासह समाजाने दखल घेऊन त्यांच्या पाठीवर शाबासकीसह त्यांना आर्थिक बळ द्यावे.

**- आकाश महालपुरे**


---

टुडेज् ब्लॉग

# भावसंगीताचा शुक्रतारा

आपल्या मखमली आणि सुरेल आवाजाने भावगीतांना वेगळाच आयाम देऊन त्यांना नव्या उंचीवर नेऊन ठेवणारे ज्येष्ठ भावगीतगायक अरुण दाते यांचा जन्म ४ मे १९३४ रोजी इंदूर मध्ये झाला. वडील रामूभैय्या दाते इंदूरचे प्रतिष्ठीत गायक असल्याने बालपणीच त्यांना घरातून संगीताचे बाळकडू मिळाले.वडिलांच्या इच्छेनुसार गायक झालेल्या अरुण दाते यांनी सुरुवातीला इंदूरजवळच्या धार येथे कुमार गंधर्व यांच्याकडे तर पुढील शिक्षण के. महावीर यांच्याकडे घेतले. दरम्यान, मुंबई येथे कापड अभियांत्रिकीचा अभ्यास करत असताना पहिल्या वर्षीच्या परीक्षेत अरुण दाते नापास झाले. तथापि, वडिलांनी त्यांना टेक्सटाईल इंजिनीयर तर अनेक जण होतील, पण तुझ्यासारखे गाणे किती जणांना गाता येते' असे विचारून गाणे शिकण्यास प्रोत्साहन दिले. घरातून असे प्रोत्साहन मिळाल्यावर दाते यशस्वी गायक झाले नसते तरच नवल.

थोडासा पातळ आणि तलत मेहमुद्च्या जातकुळीतील आवाज असणाऱ्या दाते यांनी १९५५ पासून आकाशवाणीवर गाण्यास सुरुवात केली. १९६२ मध्ये त्यांनी सुप्रसिद्ध कवि मंगेश पाडगावकरांनी लिहिलेले आणि ख्यातनाम संगीत दिग्दर्शक श्रीनिवास खळे यांनी चालबद्ध केलेले शुक्रतारा मंद वारा' हे पहिले मराठी गीत गायले आणि त्या गाण्याने इतिहास घडवला. त्या महिन्यात ते गाणे महाराष्ट्रभर पोचले व गाजले आणि दाते पहिल्या गाण्यालाच रेडीओ स्टार झाले. त्याकाळी ग. दि .मा., राजा परांजपे, सुधीर फडके ही त्रयी चित्रपट व संगीत यांमध्ये महाराष्ट्रात प्रसिद्ध होती. त्यानंतर पाडगावकर, खळे, दाते ही नवी त्रयी भावगीत संगीतात जन्मास आली. वयाच्या



पन्नाशीत म्हणजेच १९८४ पासून त्यांनी आपले लक्ष भावगीतांवर केंद्रित केले. २०१० पर्यंत अरुण दाते यांचे शुक्रतारा' या नावाने होणाऱ्या मराठी भावगीत गायनाचे २५०० हून अधिक कार्यक्रम झाले. त्यांचे उर्दूतील आणि मराठीतील गीतां चे पंधराहून अधिक अल्बमही लोकप्रिय आहेत. मंगेश पाडगावकर, यशवंत देव, आणि अरुण दाते या अनुक्रमे कवी, संगीत दिग्दर्शक आणि गायक या त्रिकुटाने मराठी भावगीताला अफाट लोकप्रियता प्राप्त करून दिली असे म्हणणे गैर ठरणार नाही. दाते यांनी लता मंगेशकर, आशा भोसले, अनुराधा पौडवाल, सुमन कल्याणपूर, सुधा मल्होत्रा, कविता कृष्णमुर्ती, पुष्पा पागधरे यांबरोबर द्वंद्वगीते गायली आहेत. त्यांचे दिनांक ६ मे २०१८ रोजी मुंबईतील कांजूरमार्ग येथील निवासस्थानी निधन झाले. भावसंगीताच्या शुक्रताऱ्यास विनम्र अभिवादन !

**– प्रा.विजय कोष्टी**

---

सगुण-निर्गुण

# पूर्णवादाची तोंडओळख

भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रारंभ वेदांपासून आहे. श्रीमद् आद्य शंकराचार्यांनी प्रस्थानत्रयी', म्हणजे व्यासप्रणीत ब्रह्मसूत्रे, दशोपनिषदे व गीता असा मार्ग क्रमून, भारतीय तत्त्वज्ञानाला उत्तम वळण लावून दिल्याने पुढील आचार्यांना याच प्रस्थानत्रयी'वर भाष्य करून सिद्धान्त मांडता आले.

कोणी शिवतत्त्वाची वा विष्णूतत्त्वाची बाजू घेऊन प्रतिपादन केले. यात विष्णूतत्त्व वा शिवतत्त्व याचा एकेकाने अंतिम सत्याच्या दृष्टीने स्वीकार केल्यामुळे, शैव किंवा शांकरमतवादी वा वैष्णव सांप्रदायी मानण्यात येऊ लागले. या सर्वांच्या दर्शनातून विश्वतत्त्व हे कार्यपक्ष म्हणून प्रतिपादन करण्यात आले; त्यामुळे विश्वतत्त्व वा जडतत्त्व यांचा नेमका सैद्धान्तिक पक्ष सिद्ध करता आला नाही.

शैव तत्त्वज्ञानाने अज्ञान वा माया हे विश्वतत्त्वाचे कारण सांगून, ते भ्रम वा खोटे, असे प्रतिपादन केल्याने विश्वतत्त्वाचे जगन्मिथ्यात्व म्हणून केवलाद्वैती तत्त्वज्ञान अपरोक्षानुभूतीने ब्रह्म सत्य जगन् मिथ्या', जिवो ब्रह्मैव न परा' याप्रमाणे मांडणी करावी लागली. वैष्णवाचार्यांनी आपल्या परीने जीवाचे नित्यत्व



व जगत् हे ईश्वराचे कार्य, अशी बाजू मांडली. मग हे जगत् ईश्वराने का निर्माण केले, याचे उत्तर तार्किक पद्धतीने न देता आल्यामुळे, या तत्त्वचिंतकांस अज्ञेयवाद स्वीकारण्याची पाळी आली. तर्को अप्रतिष्ठा' अशी तर्कातून सुटका करून घेण्यास भाग पाडले. ही चूक पूर्णवादाने ओळखली. कार्यकारणभावाची तत्त्वज्ञानात असलेली रीत मुळात चुकीची असून, भारतीय तत्त्वज्ञान स्वरूपसंबंधाच्या दृष्टीने असल्याचे सिद्ध केले.


पूर्णवादाचा सिद्धान्त पूर्णपुरुष', सिद्धी पूर्णाद्वैत', साधन त्रिकांडात्मक (ज्ञान, कर्म, उपासना) व प्राप्ती ऐच्छिक जीवन लाभ', मरणभय निवृत्ती' अशा पद्धतीने तर्कशुद्ध न्यायघटित व अनुभवसिद्ध मांडणी जगासमोर आणली. ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते। पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।।' या औपनिषदिक सिद्धान्तानुसार आपला सिद्धान्त सिद्ध केला.

---

जनमानस

# वाढत्या बेरोजगारीवर उपाय कोण करणार?

सीएमआयई नोकरी करू शकणाऱ्या लोकांचे मासिक सर्वेक्षण करून रोजगाराच्या स्थितीची आकडेवारी जाहीर करते. त्यात यावर्षीच्या फेब्रुवारी, मार्च महिन्यांत बेरोजगारीचा दर वाढत जाऊन तो एप्रिलमध्ये ८.११ टक्क्यांवर पोहोचला आहे. जागतिक लोकसंख्येच्या क्रमात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या भारतात कामगार संख्या २.५ कोटींनी वाढून ती ४६.७६ कोटींवर पोहोचली आहे. श्रमशक्ती ज्या प्रमाणात वाढत आहे त्या प्रमाणात रोजगारसंधी उपलब्ध होत नाहीत. त्याऐवजी मोठमोठ्या कंपन्या,



आस्थापनांमध्ये कर्मचारी संख्येत कपात केली जातेय. ग्रामीण भागात छोटे लघुउद्योग,शेतीपूरक व्यवसाय या निमित्ताने थोड्याफार रोजगार संधी उपलब्ध होतात, परंतु शहरी भागात तशा संधी निर्माण होताना दिसत नाही. तरीही रोजगारसंधींच्या अपेक्षांनी नोकरी इच्छुक तरुणवर्ग शहरांकडे स्थलांतर करत असतो. वर्तमानात ग्रामीण भागातील अवकाळी पाऊस, हवामान यांच्या बिघडलेल्या गणितांनी शेती व्यवसायात अनिश्चितता वाढत चालली आहे. परिणामी ग्रामीण भागातील नवीन तरुण पिढी यापुढे शेतीवर अधिक अवलंबून राहू इच्छित नाही, तिही शहरांकडे धाव घेत आहे. सीएमआयई अर्थात सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी जी काही नियमित सर्वेक्षणे करीत असते त्यांच्या आधारावर जर रोजगारसंधी उपलब्ध केल्या जाऊ शकत नाहीत तर त्यांच्या सर्वेक्षणांचे प्रयोजन नेमके कुणासाठी असते.?

**– स्नेहा राज**

---

# भगवान नृसिंह जयंती

**नृसिंह अवतार हा विष्णूच्या दशावतारांपैकी चौथा अवतार मानला जातो. वैशाख शुद्ध चतुर्दशीला हिरण्यकश्यपू या राक्षसाच्या नाशासाठी देवांच्या विनंतीवरूनच विष्णूंनी हा अवतार घेतला असल्याची आख्यायिका प्रचलित आहे. भगवान नरसिंह हे सामर्थ्य आणि पराक्रमाचे देवता आहेत. अधर्म आणि अत्याचार करणाऱ्यांना भगवान नरसिंह कठोर शिक्षा देतात. नृसिंहाच्या सन्मानार्थ वैशाख शुक्ल षष्ठीपासून ते चतुर्दशीपर्यंत नृसिंहाचे नवरात्र साजरे होते. वैशाख शुक्ल चतुर्दशीला नृसिंह जयंती येते. आपला भक्त प्रल्हाद याच्या रक्षणासाठी भगवान विष्णूने अर्धे मनुष्य आणि अर्धे सिंहाचे शरीर धारण करून राक्षसांचा राजा हिरण्यकशिपू याचा वध केला होता. म्हणूनच या दिवशी नरसिंह जयंती साजरी केली जाते.**

कश्यप ऋषींच्या दोन मुलांपैकी एकाचे नाव हिरण्यकश्यप होते. त्याने कठोर तपश्चर्या करून ब्रह्माजींना प्रसन्न केले होते आणि देव, देवी, पुरुष, स्त्री, असुर, यक्ष किंवा इतर कोणताही प्राणी त्यांना मारू शकणार नाही असे वरदान प्राप्त केले होते. ना दिवसा, ना रात्री, ना दुपारी, ना घरात, ना बाहेर, ना आकाशात, ना पाताळात, ना अस्त्राने, ना शस्त्राने कोणीही त्याचा वध करु शकतं नव्हतं. हे वरदान प्राप्त करून तो स्वतःला देव समजू लागला.

हिरण्यकश्यप आपल्या प्रजेला त्याची पूजा करण्यास भाग पाडू लागला, जे त्याची पूजा करत नाहीत, त्यांचा तो विविध प्रकारे छळ करत असे. भगवान विष्णूच्या भक्तांवर त्यांचा राग यायचा.



हिरण्यकश्यपला प्रल्हाद नावाचा मुलगा होता. तो भगवान विष्णूचा निस्सीम भक्त होता.हिरण्यकश्यपला ही गोष्ट कळताच त्याने प्रल्हादला समजावले. त्याने आपल्या मुलाला सांगितले की मीच देव आहे, त्याने फक्त त्याचीच पूजा करावी. परंतु हिरण्यकश्यपने वारंवार ताकीद दिल्यानंतरही प्रल्हादने भगवान विष्णूंवरील आपली भक्ती सोडली नाही.

हिरण्यकश्यपने प्रल्हादला आपला अपमान समजून मारण्यासाठी खूप प्रयत्न केले, परंतु श्री हरी विष्णूच्या कृपेने तो वाचला. शेवटी हिरण्यकश्यपने आपली बहीण होलिकाला प्रल्हादला हातात घेऊन अग्नीत बसण्यास सांगितले. होलिकाला आशीर्वाद मिळाला होता की अग्नी तिला जाळू शकत नाही. पण जेव्हा होलिका प्रल्हादला आपल्या मांडीवर घेऊन अग्नीत बसली तेव्हा श्रीहरीच्या कृपेने ती स्वतः त्या आगीत जळून गेली आणि प्रल्हाद वाचला.

शेवटी चिडलेल्या हिरण्यकश्यपने आपला मुलगा प्रल्हाद याला एका खांबाला बांधले आणि त्याला मारण्यासाठी तलवार काढली आणि म्हणाला, मला सांग तुझा देव कुठे आहे, प्रल्हाद म्हणाला की या खांबात देखील देव आहे. हे ऐकून रागाच्या भरात हिरण्यकश्यप प्रल्हादचा वध करणार तेवढ्यात खांबातून नृसिंह बाहेर पडले हिरण्यकश्यपचा वध केला.

फळ- शारीरिक आणि आध्यात्मिक प्रगतीसाठी भगवान विष्णूच्या नरसिंह अवताराची पूजा केली पाहिजे. पद्म पुराणानुसार भगवान विष्णूच्या या उग्र रूपाची पूजा केल्याने पाप नष्ट होते आणि संकटेही दूर होतात. ज्याप्रमाणे विष्णुजींनी भक्त प्रल्हादाचे रक्षण केले, त्याचप्रमाणे कोणत्याही संकटाच्या वेळी भगवान नरसिंहाचे स्मरण केल्यास भक्तांना संकटातून त्वरित मुक्ती मिळते. जे भक्त नृसिंह जयंतीच्या दिवशी भगवान नृसिंहाची पूजा करतात त्यांना शत्रूंवर विजय प्राप्त होतो. कोर्टाशी संबंधित प्रकरणांमध्ये विजय प्राप्त होते. भगवान नरसिंहाची उपासना केल्याने मनोबल वाढते, ज्यामुळे आत्मविश्वास वाढतो, नकारात्मकता दूर होते आणि शौर्य, गती आणि शक्ती मिळते.

कडकडिले स्तंभ गडगडिलें गगन।
अवनी होत आहे कंपायमान।
तडतडलीं नक्षत्रे पडताती जाण।

उग्ररूपें प्रगटे तो सिंहवदन।। १ ।।
जय देव जय देव जय नरहरिराया।
आरती ओवाळू महाराजवर्या ।
जय देव जय देव ।।

एकविस स्वर्गमाळा डळमळली कैसी।
ब्रह्मयाच्या वाटे अभिनव चित्तासी।
चंद्रसूर्य दोनी लोपति प्रकाशीं।
कैलासीं शंकर दचके मानसीं।। २ ।।

जय देव जय देव जय नरहरिराया।
आरती ओवाळू महाराजवर्या।
जय देव जय देव ।।

थरथरती त्या जटा जिव्हा लळलळित।
तीक्ष्ण नखांनीं ऐसा दैत्य तो विदारीत।
अर्धांगी कमलजा शिरीं छाया धरित।
माधवदासा स्वामी नरहरि शोभत।। ३ ।।

जय देव जय देव जय नरहरिराया।
आरती ओवाळू महाराजवर्या।
जय देव जय देव ।।

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## शनिवार-रविवार देखील दुय्यम निबंधक कार्यालय चालू राहणार

सोलापूर : खरेदी -विक्री व्यवहारांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांना त्यांच्या कामाच्या वेळेत दस्त नोंदणी करणे शक्य होत नाही. तसेच दुय्यम निबंधक कार्यालयात नागरिकांची वाढती गर्दी लक्षात घेता नागरिकांना सुट्टीच्या दिवशीही दस्त नोंदणी करता यावी, यासाठी जनतेच्या सोईसाठी शनिवार आणि रविवार देखील चालू राहणार आहेत. त्यामुळे आता सुट्टीच्या दिवशी देखील दस्त नोंदणी करता येणार आहे. यासाठी खास सुट्टी घेण्याची गरज नाही, असे राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

सामान्य जनतेच्या सोयीसाठी जिल्हा मुख्यालय आणि महानगरपालिका क्षेत्रातील दुय्यम निबंधक कार्यालये शनिवार आणि रविवार या सुट्टीच्या दिवशीही सुरू राहणार आहेत. त्यामुळे नागरिकांना दस्त नोंदणीत अडचण होणार नाही.

यामुळे आता नॉनस्टॉप दस्त नोंदणी होणार आहे. खरेदी -विक्री व्यवहारामध्ये वाढ होत असल्याने नागरिकांना त्यांच्या कामाच्या वेळेत दस्त नोंदणी करता येत नाही तर तसेच दुय्यम निबंधक कार्यालयात नागरिकांची वाढती गर्दी लक्षात घेता नागरिकांना सुट्टीच्या दिवशीही दस्त नोंदणी करता यावी हा दृष्टिकोनातून हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. मुंबई विभागातील (मुंबई शहर, उपनगर), कोकण विभागातील (ठाणे शहर, ठाणे ग्रामीण, पालघर, रायगड अलिबाग), पुणे विभागातील (सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर), अमरावती विभागातील (अकोला, अमरावती), नागपूर विभागातील (नागपूर), लातूर विभागातील (लातूर, नांदेड), नाशिक विभागातील (नाशिक, जळगाव), औरंगाबाद विभागातील(औरंगाबाद) जिल्हा मुख्यालय आणि महानगरपालिका क्षेत्रातील दुय्यम निबंधक कार्यालये शनिवार आणि रविवार या सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवत नागरिकांना सुविधा देण्याच्या सूचना महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या आहेत.

www.surajyadigital.com | गुरूवार, दि. ४ मे २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : २१४ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# 'अवकाळी'चा १२४ गावांना फटका

- दोन हजार शेतकऱ्यांचे १३१७.२० हेक्टर क्षेत्र बाधित
- केळी, आंबा, पपई, द्राक्षे, लिंबू, डाळिंबाचे नुकसान

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर जिल्ह्यात २७ आणि २८ एप्रिल असे सलग दोन दिवस झालेल्या अवकाळी पाऊसाचा बार्शी तालुका वगळता दहा तालुक्यातील १२४ गावांना फटका बसला आहे. यामध्ये १३१७.२० हेक्टर क्षेत्रावरील केळी, आंबा, पपई, द्राक्षे, लिंबू डाळिंब या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सर्वाधिक फटका करमाळा, अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर तालुक्यातील गावांना बसला आहे. पंचनामे करण्याचे काम युद्धपातळीवर चालू असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष कृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे यांनी दिली.**



सोलापूर जिल्ह्यात दोन दिवस झालेल्या अवकाळी व गारपीट मुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या तोंडांशी आलेले पिकांचे नुकसान झालेले आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यात मोठे नुकसान झाले आहे. या तालुक्यातील ४६ गावातील ४१० शेतकऱ्यांचे २७६.१० हेक्टरवरील आंबा, लिंबू, केळी, पपई, द्राक्षे पिकांचे नुकसान झाले आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील आंबा, लिंबू, केळी, पपई , दक्षिण सोलापूर तालुक्यात आंबा, पपई, केळी, डाळिंब, द्राक्ष, लिंबू पिकांना फटका बसला आहे. प्राथमिक नुकसानीचा अहवाल कृषी विभागाच्या वतीने काढण्यात आला असून १३१७.२० बाधित क्षेत्राला फटका बसला आहे.

### लवकर शासनाकडे अहवाल

सोलापूर जिल्ह्यात अवकाळी पाऊसाचा मोठा कहर झाला होता. प्राथमिक पंचनामे अहवालामध्ये १३१७.२० हेक्टर क्षेत्रावर नुकसान झाले आहे. पंचनामे करण्याचे काम चालू आहे. ते पूर्ण झाल्यानंतर नुकसान भरपाई साठी प्रस्ताव शासनाकडे सादर केला जाईल.

**- बाळासाहेब शिंदे (जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी)**

### या तीन तालुक्यात जास्त नुकसान

करमाळा, दक्षिण सोलापूर आणि उत्तर सोलापूर तालुक्यातील नुकसान झाले आहे. करमाळा तालुक्यातील ६३० हेक्टर वरील बागायती तर दक्षिण सोलापूर तालुक्यातील १७६.१० हेक्टरवरील केळी द्राक्षे, आंबा, लिंबू या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. मंगळवेढा तालुक्यातील २२१ हेक्टर क्षेत्रावरील दोडका, कांदा, शेवगा, मका, डाळिंब भाजीपाला या पिकांना मोठा फटका बसला आहे

### तालुकानिहाय झालेले नुकसान





▸ **उत्तर सोलापूर** : १७ गवातील १५३ शेतकऱ्यांचे १०४.६० हेक्टर क्षेत्र बाधित ▸ **दक्षिण सोलापूर** : ४६ गावातील ४१० शेतकऱ्यांचे २७६.१० हेक्टर क्षेत्र ▸ **मोहोळ तालुका** : ९ गावातील ३७ शेतकऱ्यांचे २३.४० हेक्टर ▸ **अक्कलकोट तालुका** : ११ गावातील ५४ शेतकऱ्यांचे २३.६० हेक्टर ▸ **माढा तालुका** : २ गावातील १५ शेतकऱ्यांचे ७.६० हेक्टर ▸ **करमाळा तालुका** : ३१ गावातील ११७० शेतकऱ्यांचे ६३०.०० हेक्टर ▸ **माळशिरस तालुका** : १ गावातील ७ शेतकऱ्यांचे ६.०० हेक्टर ▸ **सांगोला तालुका** : ०२ गावातील २९ शेतकऱ्यांचे २१.००हेक्टर ▸ **मंगळवेढा तालुका** : ०४ गावातील २२१ शेतकऱ्यांचे १७२.०० हेक्टर ▸ **पंढरपूर तालुका** : १ गावातील १०१ शेतकऱ्यांचे ५१.००हेक्टर

# राष्ट्रवादी काँग्रेसचे 'वऱ्हाड' रविवारी सोलापुरात

सुराज्य/सोलापूर

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी २ मे रोजी अध्यक्षपदावरून निवृत्त घोषणा केल्यानंतर राजकारणात प्रचंड खळबळ उडाली आहे. येत्या ५ रोजी राष्ट्रवादीचा नवा अध्यक्ष निवडीचे संकेत असून त्यानंतर शरद पवार यांच्यासह राष्ट्रवादीचे राज्यातील डझनभर नेत्यांचं 'वऱ्हाड' सोलापूरच्या दौऱ्यावर येणार आहे.

सांगोला तालुक्यातील दोन राजकीय कार्यक्रमांना राष्ट्रवादीचे नेते शरद पवार हे हजेरी लावणार असून त्यातील एका कार्यक्रमात साखर सम्राट अभिजीत पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत, असे सांगण्यात आले. सांगोला येथील कार्यक्रम आटोपून सायंकाळी माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या पुतण्याच्या विवाह सोहळ्यासाठी शरद पवार हे हजेरी लावणार आहे. यावेळी शरद पवार यांना आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा, यासाठी जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे नेते साकडे घालणार आहेत. कालच शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीत शरद पवार यांनी आपला निर्णय मागे घ्यावा, असा एकमताने ठराव पारित करण्यात आला आहे. ही बैठक तातडीने घेण्याऐवजी सायंकाळी उशिरा घेतल्याबद्दल शहराध्यक्ष भारत जाधव यांच्यावर अनेकांनी तोंडसुख घेतले आहे. तर इकडे पवारांच्या या निर्णयावर बैठक घेण्याचे स्वारस्य जिल्हा राष्ट्रवादीच्या एकाचे नेत्याने न दाखविल्याने पवारांवर कुणाचे प्रेम किती यावरच राष्ट्रवादीत चर्चा रंगू लागली आहे.



### सुप्रिया सुळे आघाडीवर...



**राष्ट्रवादी काँग्रेसचा नवा अध्यक्ष निवडीची घोषणा स्वत: शरद पवार हे ५ मे रोजी मुंबईतून करणार असल्याचे संकेत आहेत. यासाठी आज बुधवारी मुंबईत अध्यक्ष निवड समितीची बैठक पार पडली. यावेळी खा. सुप्रिया सुळे, खा. प्रफुल्ल पटेल आणि विरोधी पक्षनेते अजित पवार या तीन नावावर चर्चा झाली. यातील प्रफुल्ल पटेल यांनी नकारघंटा वाजविली आहे. तर अजित पवार यांनाही या पदाबाबत स्वारस्थ नसल्याचे समजले. त्यामुळे खा. सुप्रिया सुळे यांच्याच गळयात अध्यक्षपदाची पाळ पडण्याची शक्यता आहे.**

### विश्वासात न घेतल्याने नाराजीचा सूर

शरद पवार यांनी अध्यक्षपदाबाबत घेतलेला निर्णय ह कौटुबिक पातळीवर चर्चा करुन घेतल्याची माहिती बाहेर पडताच. राष्ट्रवादी काँग्रेसमधील बऱ्याच नेत्यानी मुंबईतील बैठकीत नाराजीचा सूर आवळला. हा शरद पवार यांचा कोटुंबिक मुद्दा नाही तर तो राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा आहे, त्यामुळे सर्वांना विश्वास का घेतले नाही, असा सूर या बैठकीत उमटल्याचे सांगण्यात आले.

# डीसीसीच्या निवडणुकीचे नेत्यांचे मनसुबे धुळीला

- शासनाने प्रशासकाची मुदत एका वर्षासाठी वाढवली
- २०२४ पर्यंत राहणार कुंदन भोळे प्रशासक म्हणून

सुराज्य/सोलापूर

शेतकऱ्यांसाठी संजीवनी असणारी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अर्थात डीसीसी बँक पुन्हा एकदा पूर्वपदावर आणायची असेल तर इतक्यात बँकेचा कारभार संचालक मंडळाच्या ताब्यात द्यायला नको. आणखी किमान एक वर्ष तरी बँकेवर प्रशासकच असायला हवा, तरच बँक आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि सुदृढ होईल; असा दावा सहकार विभागाने शासनाकडे केला होता. त्यामुळे प्रशासकाला आणखी किमान एक वर्षाची मुदतवाढ मिळण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. त्याला शासनाने मान्यता देऊन प्रशासकाचा कालावधी ३१ मार्च २०२४ पर्यंत वाढविला आहे. राज्य शासनाच्या सहकार विभागाने यासंदर्भात बुधवारी आदेश काढला आहे. त्यामुळे डीसीसीच्या निवडणुकीसाठी मनसुबे रचणाऱ्यांचे मनसुबे धुळीस मिळाले आहेत.

कर्जवाटपातील अनियमितता व वसुलीअभावी थकबाकी वाढत गेल्याने जिल्हा मध्यवर्ती बँकेला आर्थिक घरघर लागली. शेतकऱ्यांची आर्थिक नाडी म्हणून ओळखली जाणारी बँक कायमची बंद पडण्याच्या मार्गावर होती. तेव्हा मे २०१८ मध्ये तत्कालीन भाजप-शिवसेना युती सरकारने बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून बँकेवर प्रशासकांची नियुक्ती केली. सुरुवातीला तत्कालीन जिल्हा उपनिबंधक अविनाश देशमुख यांनी प्रशासक म्हणून काम पाहिले. त्यानंतर पुणे विभागाचे अप्पर निबंधक शैलेश कोतमिरे यांच्याकडे प्रशासकपदाची धुरा आली. कोतमिरे यांनी त्यांच्या कार्यकाळात कठोर निर्णय घेत बँकेला आर्थिक शिस्त लावली. विविध योजना राबवून बँक पूर्वपदावर आणण्याचा त्यांनी अटोकाट प्रयत्न केला. आता बँकेचा कारभार कुंदन भोळे यांच्या हाती आहे. त्यांचेही कोतमिरे यांच्याप्रमाणेच बँकेला पुनर्वैभव मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेने तोट्यातून बाहेर पडत ३४ कोटी ५ लाखांचा निव्वळ नफा मिळविला आहे. बँकेची प्रगती अशीच होत राहिली तर पुढील वर्षभरात बँक निश्चितच पूर्वपदावर येणार असल्याचा विश्वास सहकार विभागाला आहे.

दरम्यान, विद्यमान प्रशासकांची मुदत येत्या ३ जून रोजी संपणार असल्याने बँकेच्या कारभाराविषयी अडचणी होत्या. त्यामुळे प्रशासकाला आणखी एक वर्ष मुदतवाढ देण्यासंदर्भात प्रस्ताव तयार करून सहकार विभागाने तो शासनाला सादर केला होता. या प्रस्तावाला राज्य शासनाने हिरवा कंदील दाखविला आहे. शासन आदेशानुसार आता प्रशासकाचा कालावधी ३१ मार्च २०२४ पर्यंत राहणार असल्याचे निश्चित झाले आहे.



### शिंदे-फडणवीस सरकारची खेळी यशस्वी

प्रशासकांचा कालावधी संपणार असल्याने संचालक मंडळाच्या निवडणुकीची चाहूल राष्ट्रवादी, काँग्रेसच्या नेतेमंडळींना लागली होती. या बँकेवर आतापर्यंत राष्ट्रवादी व काँग्रेसचेच वर्चस्व राहिले आहे. आता निवडणुका झाल्या तर बँकेवर पुन्हा राष्ट्रवादी आणि काँग्रेसची सत्ता येणार असल्याने राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारने प्रशासकाला मुदतवाढ देऊन आपली खेळी यशस्वी केली आहे. यामुळे राष्ट्रवादी व काँग्रेसच्या नेतेमंडळींचे मनसुबे धुळीला मिळाले आहेत.




भगवान नृसिंह जयंतीनिमित्त कोटी-कोटी प्रणाम

## जनावरे कत्तलीस नेणारा टेम्पो पोलिसांनी पकडला

बार्शी : बार्शी शहरातून एका टेम्पोत कमी जागेत १२ जनावरांच्या मुसक्या बांधून व कोणतीही चारा पाण्याची व्यवस्था नसताना दाटीवाटीने बांधून कत्तलखान्याकडे घेऊन जाणाऱ्या टेम्पोस शहर पोलिसांनी अडवले. तो ताब्यात घेऊन चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यातील तिघांना अटक केली आहे. दि. २ मे रोजी पहाटेच्या सुमारास मार्केट यार्डातून ही जनावरे घेऊन जात असताना हा टेम्पो पकडण्यात आला.

याबाबत शिवाजी श्रीधर काळे रा.कुसलंब ता. बार्शी, चालक वसंत कृष्णा शिंदे (वय६० रा.धानोरे ता. बार्शी, आलिम सौदागर रा. बार्शी) याना अटक केली तर चौथा रमजान सौदागर रा.बार्शी हा कार मधून पळून गेल्याने यांच्या विरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक व महाराष्ट्र पशू संरक्षण १९६ नुसार पोलीस निलेश अनंतकवळस यांनी फिर्याद देताच गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी ती जनावरे ताब्यात घेऊन ती गोशाळेत सोडली आहेत.

# महापालिकेला शोध पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचा; जाहिरात देऊनही प्रतिसाद नाही

▸ प्रशासनाची वाढली डोकेदुखी

सुराज्य/सोलापूर

महात्मा गांधी प्राणिसंग्रहालयात प्राण्यांवर उपचार करण्यासाठी महापालिका डॉक्टरच्या शोधात आहे. दोनवेळा निविदा काढूनही प्राण्यांचे डॉक्टर (पशुवैद्यकीय अधिकारी) काही मिळू शकला नाही. दुसरीकडे शहरातील भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. दोन्हीसाठी पशुवैद्यकीय अधिकाऱ्याची नितांत आवश्यकता आहे मात्र जाहिरात देऊनही प्रतिसाद मिळू शकत नसल्याने पालिका प्रशासनाची डोकेदुखी वाढली आहे.

सोलापूर शहरात भटक्या व पिसाळलेल्या कुत्र्यांचा सुळसुळाट मोठ्या प्रमाणात सुरू आहे. काहीठिकाणी कुत्र्यांनी चावा घेऊन जखमी केले आहे. शास्त्रीनगर येथे काही तरुण, ज्येष्ठांना, चिमुकल्यांना भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याची तक्रार आहे. खुद्द जखमी लोकांनी येऊन आयुक्तांना निवेदन दिले होते. याविषयी महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी या भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात येईल असे सांगितले होते. मात्र प्राण्यांवर उपचार करणारे पशुवैद्यकीय अधिकारी नाहीत ही मोठी अडचण महापालिकेची झाली आहे. याबाबत दोनवेळा निविदा काढली. मात्र अद्यापही पशुवैद्यकीय अधिकारी मिळत नसल्याचे सांगितले. त्यामुळे प्राण्यांचा आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दुसरीकडे महात्मा गांधी प्राणी संग्रहालय सुरू करण्यासाठी महापालिकेचे युद्ध पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. अत्याधुनिक दवाखाना, किचन स्टोअर, सुरक्षाभिंत तसेच तज्ज्ञ कर्मचारी, अतिरिक्त प्राणी यांसह ३२ त्रुटी काढले होते. केंद्रीय चिडिया घर प्राधिकरणाने काढलेल्या त्रुटींची पूर्तता महापालिकेकडून दूर करण्यात येत आहेत.

या त्रुटीमध्ये पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. त्यासाठी महापालिका प्रशासन पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या शोधात आहे. त्याचबरोबर शहरातील भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे अशा दोन्हीसाठी पशुवैद्यकीय अधिकाऱ्याची नितांत आवश्यकता आहे. मात्र ते मिळत नसल्याचे महापालिकेची अडचण होत आहे.

### प्रशासन पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या शोधात : आयुक्त

दोन ते तीन वेळा जाहिरात देऊनही पशुवैद्यकीय अधिकारी मिळाला नाही. महापालिका प्रशासन प्राण्यांच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या शोधात आहे, असे महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी सांगितले.



## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




तूमी कोनत्या टीमकडून हायसा?

| कल्याण |
| --- |
| 880-63-148 |

| मेन बाजार |
| --- |
| 570-24-130 |

## दाळमिलमध्ये बंगालच्या तरुणाची आत्महत्या

सोलापूर : मुळेगावतांडा (ता.दक्षिण सोलापूर) येथील रामदेव दाल मिलच्या आवारात पश्चिम बंगाल येथे राहणाऱ्या एका १८ वर्षीय मजुराने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बुधवारी पहाटेच्या सुमारास उघडकीस आली. लक्ष्मीनारायण मन्दु मारडी (वय १८ रा. धनसला प.बंगाल) असे मयताचे नाव आहे. पहाटे दोन वाजण्याच्या पूर्वी त्याचा मृतदेह रामदेव दाल मिलच्या आवारात असलेल्या लोखंडी अँगलला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार सय्यद पुढील तपास करीत आहेत.

# पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बिबट्या ठार

### पळसदेवनजीक काळेवाडी येथे अपघात

सुराज्य/सोलापूर

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर पळसदेव नजीक काळेवाडी येथे अज्ञात वाहनाच्या धडकेने बिबट्याचा मृत्यू झाला.

मंगळवारी रात्री पावणेदहाच्या सुमारास अज्ञात जड वाहनाची बिबट्याला धडक बसली असावी, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. बिबट्याचे वय तीन ते चार वर्षांचे असून वजन पन्नास किलोहून अधिक असावे, असा अंदाज आहे. गेले अनेक दिवस या बिबट्याचे अस्तित्व कोणाच्याही निदर्शनास आले नसल्याने या परिसरातील शेतकऱ्यांना आणि रहिवाशांना प्रचंड धक्का बसला आहे. या महामार्गालगतच दक्षिण बाजूला वन विभागाचे मोठे क्षेत्र असून मोठी झाडी आणि दऱ्याखोऱ्यांचा प्रदेश आहे. तर, उत्तरेला उजनी जलाशयाचा भाग आहे. याच भागात शेती मोठ्या प्रमाणामध्ये असल्याने शेतकऱ्यांचा वावर या परिसरामध्ये रात्री अपरात्री कायम असतो. अशा रहदारीच्या ठिकाणी बिबट्या मृत अवस्थेत आढळून आल्याने प्रचंड खळबळ उडाली आहे.







## करजगी यांची कॅलिफोर्नियाची डॉक्टरेट सोलापूरचा सन्मान वाढविणारी : औटी

**सोलापूर :** कुमार करजगी यांना मिळालेली कॅलिफोर्नियाची डॉक्टरेट ही सोलापूर शहराचा सन्मान वाढवणारी आहे, असे गौरवोद्गार ज्येष्ठ कवी देवेंद्र औटी यांनी काढले. कॅलिफोर्निया विद्यापीठाची डॉक्टरेट मिळाल्या प्रित्यर्थ अखिल भारतीय माजी सैनिक संघटने मार्फत कुमार करजगी यांचा सत्कार महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष अरुणकुमार तळेखेडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. सत्काराला उत्तर देताना म्हणाले करजगी म्हणाले की मी माझ्या आयुष्यात कामगारांचे प्रश्न शैक्षणिक, सामाजिक प्रश्न सत्य प्रामाणिकपणा आणि नीती धर्माची कास धरुन संघर्षाने सोडवण्याचा प्रयत्न केलेला आहे. वास्तविक हा सन्मान सत्याचा आहे असे मी मानतो. याप्रसंगी माजी सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष व महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष अरुण कुमार तळीखेडे श्री स्वामी एस एम, बबनराव रोकडे मंगळवेढा, मल्लिनाथ हानमशेटटी, सुभेदार मेजर रावसाहेब काशींद, सुधाकर पोळ, अशोक ढेपे, आबांना माळी, व बरेच माजी सैनिक विरनारी यांचेसह सदस्य उपस्थित होते.

## आनंदमूर्ती यांच्या जन्मदिनानिमित्त शुक्रवारी विविध कार्यक्रम

**सोलापूर :** आनंदमार्ग प्रचारक संघाचे गुरूदेव श्री आनंदमूर्ती यांच्या १०२ व्या जन्मदिनानिमित्त दि. ५ मे रोजी विजापूर रोडवरील नम्रता सोसायटी येथील आश्रमात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आचार्य सिध्ददेवानंद अवधुत यांनी दिली. दि. ४मे रोजी सकाळी ७ ते ८ योगासन स्पर्धा, ९ ते १० लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा, १० ते ११ रांगोळी स्पर्धा, सायं. ५ ते ६ संगीत खुर्ची स्पर्धा, ७ ते ८ कौशीकि आणि तांडव स्पर्धा तर दि. ५ मे रोजी पहाटे ५ वाजता पासून किर्तन, भजन, प्रवचन अशा विविध धार्मिक कार्यक्रमा नंतर महाप्रसादाचे वाटप होणार आहे. तरी भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवहान आचार्य सिध्ददेवानंद अवधूत यांनी केले आहे.

## कामगार दिनानिमित्त पालावर राहणाऱ्या मुलांना कपडे वाटप

**सांगोला :** मातोश्री वृद्धाश्रम व आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त पालावर राहणाऱ्या ३२ लहान मुलामुलींना नवीन कपडे व ९ महिलांना साड्या वाटप करण्यात आले. सांगोला येथील आपुलकी प्रतिष्ठान व वृध्दांचा सांभाळ करणाऱ्या सांगोला येथील मातोश्री वृद्धाश्रम यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र दिन व कामगार दिन आगळयावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. यानिमित्त वासुद रोड, सांगोला येथील पाण्याच्या टाकीजवळ पालं टाकून राहणाऱ्या गरीब कुटुंबातील ३२ लहान मुला-मुलींना नवीन कपडे तसेच नऊ महिलांना साड्या वाटप करण्यात आल्या. यावेळी आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव मातोश्री वृद्धाश्रमाचे अध्यक्ष राहुल जाधव, सचिव अशोक जाधव, आपुलकीचे सचिव संतोष महिमकर, हरिभाऊ जगताप, प्रा. विधिन कांबळे, महादेव दिवटे, प्रमोद दौंडे, श्रीपती आदलिंगे, विजय म्हेत्रे, जितेंद्र बोत्रे, दादा खडतरे, अच्युत फुले, शिवदास राऊत, सुरेश चौगुले, प्रसन्न कदम, दत्तात्रय दौंडे सुनील मारडे, अमर कुलकर्णी, रविंद्र कदम आदिसह पालवरील कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

## CRIME NEWS

### बालाजी मंदिराजवळ तलवारीने मारहाण

**सोलापूर :**सदर बझार परिसरातील बालाजी मंदिराजवळ भांडण सोडविण्यास गेले असता तलवार आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत अनिल हिरासिंग कजाकवाले (वय ५० रा.लोधी गल्ली हे जखमी झाले . ही घटना बुधवारी दुपारच्या सुमारास घडली . त्यांना उपचारासाठी सुमन (पत्नी) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले . त्यांना अजय चौधरी, किरण मदनावाले आणि इतर दोन जणांनी मारहाण केली. अशी नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे .

### वरवडे येथे अपघात; पादचारी वृद्ध ठार


**सोलापूर :**पुणे महामार्गावरील वरवडे (ता.माढा ) येथे अनोळखी वाहनाच्या धडकेने उत्तम निवृत्ती वजाळे (वय ७५ रा.वरवडे) हे गंभीर जखमी होऊन मयत झाले. हा अपघात मंगळवारी दुपारच्या सुमारास घडला. ते शेतातून पायी घराकडे निघाले होते. त्यावेळी पुणे ते सोलापूरच्या दिशेने जाणाऱ्या अनोळखी वाहनाच्या धडकेने हा अपघात घडला. अशी नोंद टेंभुर्णी पोलिसात झाली. फौजदार पवार पुढील तपास करीत आहेत.

### बाळे येथे रिक्षा अपघात ३ जखमी

**सोलापूर :**एसटी स्टँड ते पाकणी येथे रिक्षातून जात असताना टाटा शोरूम जवळ पिकपच्या धडकेने रिक्षामधील राहुल जगन्नाथ शेटे (वय २२ रा.नांदेड), आदिनाथ कालिदास गोडसे (वय ५७ रा.पेनुर) आणि रतन भोसले (वय ४३) असे तिघेजण जखमी झाले. हा अपघात बुधवारी दुपारच्या सुमारास घडला. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी रतन भोसले याची प्रकृती गंभीर आहे. या अपघाताची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे.


## निधन वृत्त

### रुक्मिणी रोकडे



**पिलीव :** माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील रुक्मीणी विठ्ठल रोकडे (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### अशोक कोनापुरे



**सांगोला :** महादेव गल्ली येथील प्रगतिशील शेतकरी अशोक मलाप्पा कोनापुरे (वय ६९) यांचे बुधवारी सायंकाळी ६ वाजता हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले.गुरुवारी सकाळी ११ वाजता त्यांच्या राहत्या घरापासून अंत्ययात्रा निघणार असून तुळजापूर वेस येथील रूद्रभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.त्यांच्या पश्यात पत्नी, ३ भाऊ, १ मुलगा,सून व नातवंडे असा परिवार आहे

# आठ दिवसात समस्या सोडवा, अन्यथा आयुक्तांच्या घरावर मोर्चा

## प्रभाग १५ मधील समस्यांबाबत काँग्रेसचे आयुक्त कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन

सुराज्य/सोलापूर



प्रभाग क्रमांक १५ मधील विविध नागरी समस्याच्या मागणीसाठी काँग्रेसच्या वतीने युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष अंबादास करगुळे यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी महापालिका आयुक्त कार्यालयासमोर ठिया आंदोलन करून निदर्शने करण्यात आली. येत्या आठ दिवसात प्रभाग क्रमांक १५ मधील विविध भागातील समस्या न सोडवल्यास महापालिका आयुक्तांच्या घरावर मोर्चा काढून असा इशाराही यावेळी करगुळे यांच्यासह काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

मागील आठवड्यात अवकाळी पावसामुळे सोलापूर शहरात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यामध्ये प्रामुख्याने प्रभाग क्रमांक १५ येथील कोनापुरे चाळ, तुराट गल्ली, लोणार चाळ, काळजापूर मारुती मंदिर परिसर या ठिकाणी सार्वजनिक शौचालयात पाणी जाऊन बंद पडले आहे. ड्रेनेज लाईन चे काम निकृष्ट झाले आहे, त्यामुळे पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात तुंबते व घरामध्ये घुसले. त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. एक-दोन ठिकाणी टपरीवर झाड पडले आहे. त्याची पहाणीही महापालिकेने केली नाही. पावसाच्या पाण्याचे नियोजन करा, संगमेश्वर कॉलेजचे ते सिटी हॉस्पिटल यासह विविध भागात नाल्यात काळ साचले आहे, त्यामुळे नालीसफाई करा, सागर बार ते कुमार चौक पर्यंत पावसाळी पाणी निचरा लाईन टाकण्यात यावी अशा विविध मागणीसाठी काँग्रेसच्या वतीने महापालिकेच्या आयुक्त कार्यालयासमोर हे आंदोलन करण्यात आले. लवकरात लवकर या मागण्या मान्य न झाल्यास महापालिकेच्या आयुक्तांच्या घरावर मोर्चाकडून असा इशाराही काँग्रेसच्या माजी नगरसेविका वैष्णवी करगुळे यांनी दिला. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी बाहेर येऊन काँग्रेसचे निवेदन स्वीकारले. यावेळी काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे, माजी शहर युवक काँग्रेस अध्यक्ष अंबादास करगुळे, माजी नगरसेविका वैष्णवी करगुळे, केशव इंगळ, मनीष गडदे, मल्लू म्हेत्रे, छाया बंडगर, केशर हाडमोडे, मनीषा कदम, विजयालक्ष्मी कुमार, सुवर्णसंधी वाडकर, बसवराज घंटे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

### स्मार्ट सिटीची कामे निकृष्ट दर्जाची

प्रभाग क्रमांक १५ येथील स्मार्ट सिटी अंतर्गत करण्यात आलेली कामे पूर्णपणे निकृष्ट दर्जाची झाल्याचा आरोप माजी नगरसेविका करगुळे यांनी केला.. येथील ड्रेनेजलाईन मोठी करण्याऐवजी लहान आकाराची करण्यात आली आहे. त्यामुळे पावसाचे पाणी घरात शिरत आहे. ड्रेनेज लाईन पावसामुळे तुंबत आहे. पावसाळापूर्वीच नालेसफाई करणे गरजेचे आहे, असे त्यांनी म्हटले.

## डॉ.राजेंद्र दास यांना बोल्ली स्मृती साहित्य पुरस्कार



**सोलापूर :** येथील महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा सोलापूर आणि चंडक परिवार यांच्या वतीने ज्येष्ठ कवी,स्व.डॉ.लक्ष्मीनारायण बोल्ली यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा साहित्य पुरस्कार यंदाच्या वर्षी कुर्डूवाडीचे ज्येष्ठ साहित्यिक आणि कवी प्रा.डॉ. राजेंद्र दास देण्यात येणार आहे. अशी माहिती महाराष्ट्र साहित्य परिषद सोलापूर शाखेच्या अध्यक्षा डॉ.श्रुतिश्री वडगबाळकर आणि कार्याध्यक्ष किशोर चंडक यांनी दिली.

शनिवार दि. ६ मे रोजी सायंकाळी ६ वाजता मुरारजी पेठेतील हॉटेल सूर्या एक्झिक्युटिव्ह येथील सभागृहात प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते आणि कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आणि ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ.रणधीर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली या पुरस्काराचे वितरण होणार आहे. अकरा (११०००/-) हजार रुपये रोख, स्मृतीचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. याच कार्यक्रमात अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळावर सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषद सोलापूर शाखेचे कार्यकारणी सदस्य .ॲड.जे.जे.कुलकर्णी यांचा यावेळी सत्कार केला जाणार आहे.

यापूर्वी हा पुरस्कार सोलापूरचे ज्येष्ठ कवी नारायणकाका कुलकर्णी आणि सोलापूर आकाशवाणीचे सहाय्यक संचालक आणि ज्येष्ठ साहित्यिक सुनील शिनखेडे यांना समारंभपूर्वक देण्यात आला होता. डॉ. राजेंद्र दास यांच्या साहित्य संपदेची दखल घेऊन निवड समितीने यंदा स्व.डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली स्मृती साहित्य पुरस्कारासाठी निवड केली आहे. तरी साहित्य रसिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह मारुती कटकधोंड यांनी केले आहे.

## कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या सेवापूर्तीनिमित्त शुक्रवारी गौरव सोहळा

सुराज्य/सोलापूर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांचा पाच वर्षाचा कार्यकाळ शुक्रवार, दि. ५ मे २०२३ रोजी पूर्ण होत असून यानिमित्त त्यांचा गौरव सोहळा आयोजित करण्यात आल्याची माहिती कुलसचिव योगिनी घारे यांनी दिली.

हा गौरव सोहळा शुक्रवारी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात होणार असून या समारंभास माढा लोकसभा मतदारसंघाचे खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

याच समारंभात प्र-कुलगुरू डॉ. राजेश गादेवार यांचा ही सेवापूर्तीनिमित्त गौरव केला जाणार आहे. यावेळी गौरव समितीच्या अध्यक्षा तथा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्या पद्मजादेवी मोहिते पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

दि. ५ मे २०१८ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलगुरूपदाची सूत्रे स्वीकारून डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी आपल्या पाच वर्षाच्या कार्यकाळात विद्यापीठाच्या विकासासाठी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या कार्यकाळात विद्यापीठाची चौफेर प्रगती झाली आहे.

यानिमित्त विद्यापीठ प्रशासनाकडून त्यांचा गौरव केला जाणार आहे. याच समारंभात गौरव समितीकडून तयार करण्यात आलेल्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस गौरव ग्रंथाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन केले जाणार आहे. या समारंभास विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य, अधिकारी, पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव योगिनी घारे तसेच वित्त व लेखाधिकारी सीए श्रेणिक शहा आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. शिवकुमार गणपुर यांनी केले आहे.

## ६ ग्रामपंचायतींसाठी १६ अर्ज दाखल

**सांगोला :** तालुक्यातील सहा ग्रामपंचायतीच्या सहा जागेसाठी पोटनिवडणूक होत असून त्यासाठी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी १६ अर्ज दाखल झाले असून गळवेवाडी ग्रामपंचायत प्रभाग तीन मध्ये झलतनत जाकिर पठाण यांचा एकच अर्ज दाखल झाला आहे

हल दहिवडी ग्रामपंचायत पोट निवडणुकीच्या एका जागेसाठी तीन अर्ज, डोंगरगाव येथे एका जागेसाठी तीन अर्ज, सोनंद येथे एका जागेसाठी चार अर्ज, जवळा एका जागेसाठी दोन अर्ज, वझरे एका जागेसाठी तीन अर्ज दाखल करण्यात आले आहे तर गळवेवाडी ग्रामपंचायत एका जागेसाठी एकच अर्ज दाखल झाला आहे छाननी बुधवार तीन मे रोजी तर माघार घेण्याची तारीख आठ मे रोजी असून त्यानंतर अंतिम चित्र स्पष्ट होईल

## गुटखासाठा प्रकरणी आरोपी निर्दोष

**सोलापूर :** सलगर, (ता. अक्कलकोट) येथे २ लाखापेक्षा अधिक किंमतीचा गुटखा व पान मसाला विक्री करण्याच्या उद्देशाने आपल्या घरात साठा केल्याप्रकरणी मल्लिनाथ मलकन्न जमशेट्टी (रा. सलगर, ता.अक्कलकोट) याच्या विरुध्द भरण्यात आलेल्या खटल्याची सुनावणी सोलापूर येथील अति. सत्र न्यायाधीश व्ही. एच. पाटवदकर यांच्यासमोर होऊन न्यायाधीशांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली. सलगर गावात आरोपी मल्लिनाथ जमशेट्टी याने त्याच्या राहत्या घरात गुटखा व इतर साहित्य हे विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःच्या घरात बाळगुन आहे अशी खबर मिळाल्याने पोलीस स्टाफसह आरोपी जमशेट्टी याच्या घरावर छापा मारुन गुटखा व पान मसाला जप्त केला होता. याप्रकरणी दि. ३१ ऑगस्ट २०१९ रोजी अन्न सुरक्षा अधिकारी अशोक इलागेर यांनी आरोपीविरुध्द अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशन येथे प्रतिबंधीत पदार्थांचा साठा विक्री करण्याच्या उद्देशाने केल्याप्रकरणी फिर्याद दाखल केलेली होती. खटल्याच्या सुनावणीवेळी पोलिसांनी मारलेला छापा हाच बनावट व संशयास्पद आहे, असा युक्तिवाद आरोपीच्या वकिलांनी न्यायालयासमोर केला.

या खटल्यात आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने, ॲड. प्रणित जाधव यांनी तर सरकारतर्फे ॲड. दत्तुसिंग पवार यांनी काम पाहिले.



## मंद्रुपमध्ये मदगोंडेश्वर महाराज यात्रा उत्साहात

सुराज्य/दक्षिण सोलापूर

येथील सिध्दरत्न मदगोंडेश्वर महाराज यात्रा महोत्सव कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला . २ व ३ मे रोजी यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले . मंगळवार २ मे रोजी कुंभारीचे श्री गेनसिध्द गायन संघ व कोंकणगांवचे श्री महालिंगेश्वर गायन संघ यांचे ढोलकी गायन कार्यक्रम झाले.

त्यानंतर बुधवार ३ मे रोजी श्री मलकारसिध्द मंदिरापासुन ते माळकवठा रस्त्यावरील मदगोंडेश्वर महायाज मठापर्यंत सुवासिनींचा कुंभसोहळाचे आयोजन करण्यात अले होते . यावेळी मुख्य रस्त्यावरून श्री घुळेश्वर महाराज व मदगोंडेश्वर महाराज यांच्या प्रतिमा व पालखी मिरवणूक पाहण्यासाठी भक्तांची गर्दी दिसून येत होती . त्यानंतर दुपारी १२ वाजता सिध्दरत्न मदगोंडेश्वर महाराज पाळणा कार्यक्रम व मूर्ती तुलाभार कार्यक्रम पार पडला . यावेळी कुचनुर महादुलिंग महाराज , शिरवळ सोमनिंग महाराज , मंद्रुपचे निरंजन देवरू , भिवरगीचे महाराज , मकणापूरचे मूदकण्णा व देवेंद्र महाराज , हत्तुरचे शिलीसिध्द महाराज , संजवाडचे अमोगसिध्द व रंगसिध्द महाराज , भतगुणकीचे सिध्दप्पा महाराज , मंद्रुपचे राम महाराज , गौरचे यल्लालींग महाराज , औरादचे बसम्मा माता , उमराणीचे हणमंत पुजारी , होटगीचे यल्लालींग महाराज , यांच्यासह कर्नाटक व महाराष्ट्रातील अनेक महाराज उपस्थित होते . यावेळी माजी कृषी सभापती दादा कोरे , राष्ट्रवादीचे बाळासाहेब बंडगर , माजी सभापती गुरूसिध्द म्हेत्रे, शिवसेनेचे जिल्हाउपप्रमुख आणप्पा सतुबर , श्रीशैल खंदारे, हर्षवर्धन देशमुख, अप्पाशा व्हनमाने , शिवपुत्र जोडमोटे , सुरेश टेळे, निरंजन ख्याडे , आमसिध्द पुजारी आदि उपस्थित होते. यात्रा पार पाडण्यासाठी विठ्ठल पुढारी, मळसिध्द शिंगडगाव, सोनु नवले, बिळेणसिध्द पुजारी, अमोगसिध्द बोराळे, बाळु कुमठेकर , सोमनिंग कुमटाळे, सुनिल व्हनमाने, रमेश वाघमोडे, विश्वनाथ कुमठेकर , मशप्पा मरिआईवाले , औदुसिद पुजारी , मल्लीनाथ शेंडगे , चंद्रकांत नरूटे , रमेश कुंभार , राहुल पुजारी आदिनी परिश्रम घेतले .

## सुलेरजवळगेत खुनाचा प्रयत्न; जामीन फेटाळला

सुराज्य/सोलापूर

श्रीशैल बगले यांचा काठीने मारून खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी अटकेत असलेला नागप्पा यल्लप्पा टेंगळे (रा. सुलेरजवळगे ता.अक्कलकोट) याचा जामीन अर्ज जिल्हासत्र न्यायाधीश रेखा पांढरे यांनी नुकताच फेटाळला.

दि.२१ फेबु २०२३ रोजी सायंकाळच्या सुमारास फिर्यादी सुरेश श्रीशैल बगले यांना त्यांचा मुलगा श्रीशैल याने फोनवरून कळवले की नागप्पा टेंगळे व सुरेश टेंगळे हे त्याला मारहाण करत आहेत, तदनंतर फिर्यादी हे सदर ठिकाणी येवून आरोपी सुरेश व नागप्पा यांना जाब विचारला, त्यावेळी त्या दोघांनी तुझ्या मुलाने आम्हाला शिवीगाळ केल्याने आम्ही त्यास मारहाण केली. असे म्हणत सुरेश याने लाकडी काठीने फिर्यादीचा मुलगा श्रीशैल याचे डोक्यात जोरदार वार केला. त्याचवेळी नागप्पा याने देखील फिर्यादी व मुलास लाकडी काठीने मारहाण केली. सदर मारहाणीमुळे फिर्यादीचा मुलगा बेशुद्ध पडला. सदर मारहाणीमुळे फिर्यादीच्या मुलास डोक्यात गंभीर जखम झाली. फिर्यादीच्या मुलास डिस्चार्ज मिळाल्यानंतर फिर्यादीने आरोपींविरुध्द अक्कलकोट पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली. याप्रकरणी पोलिसांनी दोघा आरोपींना अटक केली होती .

या प्रकरणात मूळ फिर्यादीतर्फे ड.प्रशांत नवगिरे, ड.अतुल कस्तुरे, ड.श्रीपाद देशक, सरकारतर्फे अल्पना कुलकर्णी तर आरोपीतर्फे ड. म्हेत्रे यांनी काम केले पाहिले.

# जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण बदल्यांमध्ये समुपदेशनाद्वारे रिक्त पदावर बदल्या कराव्यात

**कर्मचारी महासंघाचे मागणी**

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेच्या गट क व गट ड कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांमध्ये कर्मचाऱ्यांच्या समुपदेशनाद्वारे रिक्त पदावर बदल्या करण्यात याव्यात, अशी मागणी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देऊन केली.

शासन निर्णयातील प्रकरण २ अनु. ४ क मध्ये बदली करण्याची कालर्यपध्दत विषद केलेली आहे. त्यामधील अ. क्र. ४ मध्ये समुपदेशनाच्यावेळी संबधित कर्मचाऱ्यांचा क्रमांक आल्यावर त्याला कोणत्या ठिकाणी बदली हवी आहे. त्याबाबत त्याच्याकडून पसंती लेखी स्वरूपात सोबत दिलेल्या परिशिष्ट १ मध्ये घ्यावी. उपलब्ध असलेल्या रिक्त ठिकाणांमधून व प्रशासकीय बदलीमुळे उपलब्ध होणाऱ्या ठिकाणी कर्मचाऱ्यास विकल्प देता येणार आहे. कर्मचांची पसंती विचारात घेऊन रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार कर्मचाऱ्यास केवळ तालुका न देता थेट शाळा किंवा कार्यालयातील पदावर पदस्थापना देण्यात यावी.

प्राथमिक, माध्यमिक शिक्षक, ग्रामसेवक व आरोग्य कर्मचारी यांनी नियुक्तीच्या वेळी घोषित केलेले स्वग्राम सोडून ही पदस्थापना असावी. तसेच एखादया प्रशासकीय बदलीपात्र कर्मचाऱ्यास त्याच्या पसंतीनुसार पदस्थापना देणे शक्य नसल्यास समुपदेशनाच्यावेळी उर्वरित रिक्त जागांपैकी पर्याय निवडयास त्यास मुभा द्यावी.

त्याबाबतची नोंद व कर्मचाऱ्यांची सही स्वतंत्र नोंद वहीमध्ये घ्यावी, अशी स्पष्ट तरतूद असतानासुध्दा आपल्या जि. प. ने मागील काही कालावधीमध्ये समुपदेशनाव्दारे कर्मचाऱ्यांना थेट रिक्त असलेल्या पदावर नियुक्ती न देता मुख्यालय अशी मागणी करा, असे म्हणून मुख्यालय देवून पुन्हा जि. प. स्तरावर पदस्थापना दिलेली होती. त्यामुळे या प्रक्रिया मध्ये रिक्त असलेल्या जागेवर कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात याव्यात, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

क्रि.अपील नं.५/२०१५
नि.नं.५१

**जाहीर समन्स**

**सोलापूर येथील मे.जिल्हा न्यायाधिश क्र.५ (श्रीमती एस.आर. शिंदे मॅडम सो) यांचे न्यायालयात**

**म.हुसेन उर्फ जहाँगिर कासिम अली दफेदार**
वय -८१ वर्षे, धंदा - काहीनाही,
रा.मुळेगांव, ता.द.सोलापूर, जि.सोलापूर — **- अपेलंट**

**विरूद्ध**

**श्रीमती खैरूनिसा अ.हुसेन सिद्दीकी (मयत)**
रा.६१२, साखर पेठ, सोलापूर — **-रिस्पॉडेंट**

ज्याअर्थी यातील रिस्पॉडेंट श्रीमती खैरूनिसा अ.हुसेन सिद्दीकी हे दि.२५/०२/२०१७ रोजी मयत झाले असून त्यांचे पश्चात त्यांचे जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांना या जाहीर समन्साद्वारे कळविण्यात येते की, हे समन्स प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याच्या आत किंवा दि.२२/०५/२०२३ रोजी रिस्पॉडेंट यांचे कायदेशीर वारसदार यांनी स्वतः अगर विधिज्ञामार्फत या कामी वरील न्यायालयामध्ये सकाळी ११.०० वा. हजर रहावे. जर त्याकामी आपण त्या दिवशी गैरहजर राहिल्यास सदरप्रमाणे आपले विरूद्ध पुढील हुकूम होईल याची नोंद घ्यावी. हे जाहीर समन्स माझे सहीशिक्क्यानिशी दिली. दि.०२/०५/२०२३.

सही/-
(लिपीक)

शिक्का

हुकूमावरून
सही/-
अधिक्षक,
मे.जिल्हा न्यायाधिश, सोलापूर.



## दरपत्रक न लावणाऱ्या हॉस्पिटलवर कारवाई करावी : संतोष राऊत

**अकलूज** : माळशिरस शिवसेना तालुका प्रमुख संतोष राऊत यांच्या वतीने शल्य चिकित्सक सोलापूर यांना दरपत्रक न लावणाऱ्या हॉस्पिटल वरती कारवाई करण्याचे निवेदन देण्यात आले. आज प्रत्येक घरात एखादि तरी व्यक्ती आजारी असतेच,त्यामुळे दवाखान्याचा प्रत्येकाचा कधींतरी संबंध येतच असतो,पुर्वी वैद्यकिय सेवा कमी पैशात आणि योग्य प्रकारे दिली जायची,डॉक्टर सेवा म्हणून हे काम करायचे, आज मात्र याचे व्यवसायात रुपांतर झालेले आहे, स्टाफच्या पगारी, तारांकित जिवन जगन्यासाठी लागनारा भरमसाठ खर्च यामुळे दवाखान्यात येणाऱ्या प्रत्येक रुग्नावर याचा भुर्दंड टाकला जात आहे.रुग्नाची परस्थिती कशीही असो याच्याशी दवाखन्याचे काहिही देणेघेणे नसते, आज गोरगरीबांना उपचार घेणे कठिण झालेले आहे, दवाखान्यांवरती आज शासनाचे अंकुश असने आवश्यक वाटते आहे. म्हणून सोलापुर जिल्हा शल्य चिकित्सक पाटील यांना या विषयी निवेदन दिले. त्यावेळी माळशिरस तालुका प्रमुख संतोष राऊत, उपतालुकप्रमुख महादेव बंडगर, अकलूज शहरप्रमुख अनिल बनपट्टे, उपशहरप्रमुख अमर खंडागळे उपस्थित होते.



## बाजार समिती संचालकपदी निवड झाल्याबद्दल कदम यांचा सत्कार

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील अकलूज येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत पिलीव येथील बाबुराव कदम यांनी विजय संपादन केल्याबद्दल तसेच अटीतटीच्या लढतीत डाक्टर दत्तुराम लोखंडे यांचा पराभव झाला. या दोघांचाही पिलीव येथे ग्रामपंचायत सदस्या सुषमाताई जामदार, रणजितसिंह जामदार, दामोदर लोखंडे, विजय रजपूत, अरुणसिंग जामदार, ज्येष्ठ नेते सदाशिव मदने, तानाजी लोखंडे यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

## बुद्धिवंत परीक्षेत संग्राम सावंतचे यश

**मोडनिंब** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गायकवाडवाडी अरण शाळेतील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय बुद्धिवंत परिक्षेत उत्कृष्ट गुण मिळवून गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. गुणवत्ता यादीत स्थान मिळवलेले विद्यार्थी पुढील प्रमाणेः इयत्ता १ली तून संग्राम नवनाथ सावंत (सोलापूर जिल्हा चौथा क्रमांक) समर्थ धनाजी नागटिळक (केंद्र स्तर ५वा) इयत्ता २री तून दूर्वा प्रशांत कदम ( केंद्र स्तर प्रथम क्रमांक) पूर्वा सतीश इंगळे (केंद्र स्तर द्वितीय क्रमांक) अनुष्का विठ्ठल पवार (केंदस्तर तृतीय कक्रमांक) तनुजा तात्यासाहेब गायकवाड, रिया हनुमंत रोकडे व साक्षी महारुद्र पावणे (केंद्र स्तर चौथा) इयत्ता ३री मधून पूर्वा तानाजी नागटिळक (केंद्र स्तर चौथा क्रमांक) याप्रमाणे घवघवीत यश प्राप्त केले. या विद्यार्थ्यांना वर्ग शिक्षक श्री. अभिजीत चवरे श्रीमती सुनिता राडकर यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन अध्यक्ष श्री नवनाथ सावंत उपाध्यक्षा गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य यशवंत शिंदे, केंद्र प्रमुख राजन सावंत. जिल्हा परिषद सदस्य भारत शिंदे, माजी जि.प.सदस्य शिवाजी कांबळे यांनी अभिनंदन केले.



## मधमाशांचे संगोपन करणाऱ्यांना मिळणार मधमाशी मित्र पुरस्कार

**सोलापूर** : मधमाशापालन उद्योगामध्ये उत्कृष्ठ काम केलेल्या लाभार्थी व संस्थास मधमाशी मित्र पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यासाठी मधमाशा उद्योगामध्ये सातेरी, मेलीफेरा व आग्या मधमाशांचे संगोपन करुन मधाचे उत्पादन घेणा-या घटकांनी मधमाशी मित्र पुरस्कारासाठी दिनांक ८ मे २०२३ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत राज्यातील उद्योगाला चालना व गती देण्यासाठी राज्यातील मधमाशापालन उद्योगातील कार्य करणा-या प्रगतशील घटकांची निवड करुन मधमाशी मित्र पुरस्कार देण्यात येणार आहे. सदर मधमाशी मित्र पुरस्काराचे वितरण मध संचालनालय, महाबळेश्वर येथे दिनांक २० मे २०२३ रोजी होणार आहे. पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्याकरीता जिल्ह्यातील इच्छुक लाभार्थ्यांनी जिल्हा ग्रामाद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा कार्यालय सोलापूर. व्दारा जिल्हा उद्योग केंद्र, किनारा हॉटेल समोर, होटगी रोड, सोलापूर येथून अर्ज प्राप्त करुन माहिती भरुन अर्ज करावेत असे आवाहनही जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी यांनी केले आहे.

## सावता महाराज समाधी स्थळी हरिनाम सप्ताह भाग्याची गोष्ट : कराडकर

**मोडनिंब** : संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी स्थळ अरण हे वारकऱ्यांसाठी पवित्र स्थळ असून या ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह करणे ही भाग्याची गोष्ट आहे तर या सप्ताहात किर्तनसेवा करणे हे अहमभाग्यच आहे, असे गौरवोद्गार हभप बंडातात्या कराडकर यांनी काढले. ते अरण येथील संत शिरोमणी सावतामहाराज यांच्या मंदिरात हभप गणेश महाराज उखळीकर आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. श्री संत केदारी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने श्री नरसिंह जयंती निमित्त संत शिरोमणी सावता महाराज यांच्या जन्मस्थळी श्री क्षेत्र आरण या पवित्र स्थळी चालत असलेला भव्य आणि दिव्य अखंड हरिनाम सप्ताह मध्ये चौथ्या दिवसाची कीर्तन सेवा एकादशीच्या दिनी व्याकरणाचार्य ह भ प अर्जुन महाराज लाड गुरुजी होळ संस्थान यांची झाली. या कार्यक्रमाचे आयोजक गणेश महाराज उखळीकर तसेच सुरेश महाराज परभणीकर होते. या अंतर्गत मनिषानंदजी महाराज मानवतकर यांची भागवत कथा सुरू आहे.यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष विठ्ठल आबा गाजरे अमोल महाराज वसेकर, गणेश महाराज उखळीकर, हभप बाळासाहेब निकम शेरे कराड हेही उस्थित होते.



# २०२४ ला पंधरा लाख ईव्हीएम मशीन फोडणार : अॅड.जमदाडे

सुराज्य/वेळापूर

**भारतामध्ये महिलांवर अन्याय, अत्याचार होत आहेत. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रचंड बेरोजगारी वाढली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. देशातील सर्व क्षेत्राचे खाजगीकरण झाले आहे. हे सर्व ईव्हीएम मशीन मध्ये घोटाळा करून निवडुन आलेल्या राज्यकर्त्या लोकांकडून होत आहे, असे मत भारत मुक्ती मोर्चाच्या महिला संघाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा अॅड. माया जमदाडे यांनी केले.**




भारत मुक्ती मोर्चा महिला संघाच्या वतीने महाराष्ट्रातील ३६७ तालुक्यात विविध विषयांवर प्रबोधन करून महिलांमध्ये जागृती करण्यात येत आहे.त्यानिमित्त माळशिरस तालुक्यातील खंडाळी गावात आयोजित परिवर्तन यात्रेच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी अॅड. माया जमदाडे म्हणल्या की भारतामध्ये महिलांवर अन्याय अत्याचार होत आहेत. त्यांना मुख्य प्रवाहात येण्यापासून रोखले जात आहे. त्यांच्या हक्क अधिकारांवर बंधने आणली जात आहेत.त्यामुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.देशातील सर्व क्षेत्राचे खाजगीकरण होत आहे.ओबीसी ची जातीनिहाय जनगणना न करून त्यांच्यावर अन्याय केला जात आहे. देशामध्ये अनुसुचित जाती-जमाती आणि धार्मिक अल्पसंख्यांक समाजावर मोठ्या प्रमाणात अन्याय अत्याचार वाढत आहे.यांवर विविध स्तरातून आंदोलने होत आहे. परंतु कोणाचेही समाधान होत नाही. ह्या सर्व समश्या मधुन सुटका करून घ्यायची असेल तर २०२४ ला आपल्या सर्वांना १५ लाख एतच् मशीन फोडाव्या लागतील. कारण एतच् मशीन मध्ये घोटाळा करून निवडुन आलेल्या सरकारच्या माध्यमातून ह्या सर्व घटना घडत आहेत. त्यामुळे एतच् मशिन देशातून हद्दपार झाल्याशिवाय आपल्या सर्वांच्या समस्या सुटणार नाहीत. असे मत अॅड. माया जमदाडे यांनी व्यक्त केले.

यावेळी विचार-पिठावर भारत मुक्ती मोर्चा राज्याध्यक्ष-संगीता शिंदे, भारत मुक्ती मोर्चा उपाध्यक्ष-ज्योती मिसाळ, सरपंच सुनीता सुरवसे, उपसरपंच-सुरेखा पताळे, रेखाताई कांबळे, अश्विनीताई भानवसे, प्रमिलाताई मोरे, सुरेखा वसव,रजनी साळवे, निताताई सुळे यांच्यासह माळशिरस तालुक्यातील सामाजिक राजकिय क्षेत्रातील महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमृता वाघमारे तर कार्यक्रमाचे आभार दीक्षा गायकवाड यांनी मानले.

## बसमध्ये चढताना चोरट्याने दागिन्यासह मोबाईल पळवला


**सोलापूर** : अफजलपुर येथून सोलापूर मार्गे पुण्याकडे जात असताना एसटी बस मध्ये चढत असताना चोरट्याने दागिने, मोबाईल व एटीएम असलेली पर्स चोरून नेली.ही घटना दुपारी साडेबारावाजता सुमारास एसटी बस स्थानकात घडली.



अंजली फुलचंद हब्बू (वय - ५०, रा. अफजलपुर, जिल्हा कलबुर्गी) या मुलगी तेजश्री हिच्या घरी पुणे येथे जाण्याकरिता अफजलपुर येथून सोलापुरात आल्या. सोलापूर एसटी बस स्थानकातून त्या पुणे येथे जाणाऱ्या बस मध्ये चढत सीट बघत असताना अज्ञात चोरट्याने त्यांची नजर चुकून दागिने, मोबाईल व एटीएमची पर्स पळवली. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

# अभिनय हा आतून यावा लागतो : नाना पाटेकर

### एमआयटी डब्ल्यूपीयूत दादासाहेब फाळके इंटरनॅशनल फिल्म स्कूलचे उद्घाटन




**पुणे** : अभिनय शिकविला जाऊ शकत नाही तर तो आतून यावा लागतो. पुस्तकांपेक्षा रोज भेटणाऱ्या लोकांना वाचायला शिका. जीवनात आलेले अनुभव व्यक्तीला उत्कृष्ट अभिनय शिकवू शकतो. परंतू अभिनय हा सतत अंध:कारात टाळ्या शोधत असतो. त्यामुळे यातून स्वतः ला सावरा, असे विचार प्रसिद्ध अभिनेता पद्मश्री नाना पाटेकर यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीतर्फे येत्या शैक्षणिक वर्षात नव्याने सुरू करण्यात आलेल्या दादासाहेब फाळके इंटरनॅशनल फिल्म स्कूल' चे उद्घाटन अभिनेता नाना पाटेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर.एम. चिटणीस, संजय कामटेकर, प्र कुलगुरू डॉ. तपन पांडा, कुलसचिव गणेश पोकळे, प्रसिद्ध क्रिएटीव्ह डायरेक्टर अभिजित पानसे, धिरज सिंग व दूरदर्शनचे माजी संचालक मुकेश शर्मा उपस्थित होते. नाना पाटेकर म्हणाले, कलाकार होणे म्हणजे आयुष्यभर दु:खी राहणारा. कारण रोजच्या अभिनयात सुख व दु:ख उधार घ्यावे लागते. यामध्ये आपण स्वतः बरोबरच कुटुंबालाही विसरत जातो. पुढे सर्व गोष्टी जेव्हा लक्षात येतात तेव्हा हातातून सर्व काही निसटलेले असते. सुख दु:खाची व्याख्या बदलली तरच सुखी रहाल. कठिण परिश्रमाच्या आजू बाजूला यश असते. जीवनात काहीच कठिण नाही त्यासाठी फक्त विचार सकारात्मक ठेवा. या प्रसंगी एनएसडीचे प्रमुख पद्मश्री वामन केंद्रे यांनी स्कूलला शुभेच्छा दिल्या. तसेच नाना पाटेकर यांनी वेबसाईड लॉन्च केली. एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ कराड यांच्या आशीर्वादाने व एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल कराड यांच्या संकल्पनेतून या स्कूलची स्थापना करण्यात आली आहे. धिरज सिंग यांनी प्रास्ताविक केले. डॉ.प्रीती जोशी यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.

## रेल्वे प्रवाशाला मारहाण; चौघांवर गुन्हे दाखल

सुराज्य/कुर्डूवाडी

बिदर- मुंबई रेल्वे गाडीतून बार्शी ते मुंबई असा प्रवास करताना बाथरूमच्या दरवाज्याजवळ थांबलेल्या प्रवाश्यांना रस्ता मागितल्याच्या कारणावरून प्रवाशाला जबरी मारहाण करून जखमी केले. ही घटना दि.२४ रोजी रात्री १ वाजताच्या सुमारास घडली. याप्रकरणी कुर्डूवाडी लोहमार्ग ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संतोष तुकाराम वाघ (वय ३५ रा.बार्शी) असे जखमी प्रवाशाचे नाव आहे.

फिर्यादि वाघ दि. २४ एप्रिल रोजी, बिदर मुंबई गाडी २२१४४ या एक्सप्रेसने बोगी नं. एस.५ सीट नं.११वरून मुंबईला जाण्यासाठी प्रवास करीत होते. बार्शी रेल्वे स्थानकावरून गाडी मध्यरात्री नंतर १ निघाली. गाडी कुर्डूवाडी रेल्वे स्थानक येण्याच्या अगोदर वाघ बाथरूमला गेले होते. ते बाथरूमचा दरवाजा परिसरात जागेत रस्ता अडवून तरूण उभे होते. त्यांना रस्ता मागितला असता. पाच मिनिटे थांबा असे सांगितले. थोडा वेळ बाथरूमच्या दरवाज्यात थांबून पुन्हा विनंती केली. याचा राग आल्याने मारहाण केली. पुन्हा तुला कुर्डूवाडी आल्यावर दाखवतो म्हणून दम दिला. बिदर- मुंबई सुपरफास्ट एक्सप्रेस कुर्डूवाडी स्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वर आली असता फिर्याद वाघ यांना डब्यातून ओढून बाहेर आणून चौघांनी लाथा बुक्कयांनी तसेच दगडाने डोक्यातून रक्त येईपर्यंत बेदम मारहाण केली. त्यावेळी स्टेशनवर कर्तव्यास असणाऱ्या लोहमार्ग पोलिसांनी तात्काळ आरोपींना अटक केली.



गुन्ह्यामध्ये जय चौगुले, बाबू मोरे (दोघे रा.कुर्डूवाडी) आनंद एडगे, विश्वास नवगिरे (दोघेही रा.लातूर) अशा चौघांवर लोहमार्ग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, या घटनेचा पुढील तपास एएसआय गणेश दबडे हे करीत आहेत.




## अकलूजमध्ये केमिस्ट भवनचे उद्घाटन

सुराज्य/अकलूज

अकलूजमध्ये केमिस्ट भवनचा उदघाटन समारंभ व सोलापूर जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या च नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

यावेळी प्रमुख पाहुणे महाराष्ट्र केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे नूतन संचालक तसेच महाराष्ट्र स्टेट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे सचिव बसवराज मनुरे, सोलापूर जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन चे अध्यक्ष व्यंकटेश पुजारी उपस्थित होते.

या कार्यक्रमामध्ये व्याख्याते म्हणून लाभलेले हेमंत मोरे यांनी मेडिकल मॅनेजमेंट, मॉल व कॉर्परिट व्यवसाय कसा असतो या विषयावर तर सुदर्शन पुकाळे (सी.ए) यांचे अडचणीत व्यापार की व्यापारातील अडचण या विषयावर व्याख्यान झाले. या कार्यक्रमासाठी राजेश विरपे, प्रशांत खलीपे, श्यामसुंदर बाहेती, पुंडलिक मेखले, सुनील ललवाणी, प्रतापसिंह कांचन, विवेक ननवरे, मनीष बलदवा, राजशेखर बारोळे, अनिल वैद्य उपस्थित होते.

प्रस्ताविक माळशिरस तालुक्याचे अध्यक्ष विठ्ठलराव गायकवाड यांनी केले. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी गिरीश एकतपुरे, सतीश चव्हाण, संतोष इंगळे, विजय सनसिंग, नितीन दोषी, आशा शेख, विजय जगताप, अभय जोशी,शुभम पवार, तुषार बेंद्रे, सुजित वाघ, मनोज जाधव,शुभम चव्हाण,रवि जगताप, शंकर पवार, प्रदीप भोरे, सुनील कोळेकर, रमजान मुलानी, तुषार जाधव, अमरसिंह गायकवाड प्रतीक शिंदे, आनंद शिंदे,संजय म्हस्के, वैभव सावंत, वैभव यादव,भरतेश वैद्य, संजय जगदाळे, अतुल जाधव,शेखर गाडेकर, अतुल आर्वे, विशाल खंडाळके यांनी विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष साठे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता सुमधुर भोजन व ऑर्केस्ट्रा यांनी झाली.

## खिलारवाडीतील कार्यकर्त्यांने पवारांना रक्ताने लिहिले पत्र

**सांगोला** : सांगोला तालुक्यातील खिलारवाडी येथील कार्यकर्त्यांने खासदार पवार यांनी राजीनाम्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करावा यासाठी रक्ताने पत्र लिहिले.

खिलारवाडी येथील भूषण चंद्रकांत बागल या तरुणाने रक्ताने लिहिलेले पत्र सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. शेतकऱ्यांच्या भावनांचा विचार करून आपण आपला राजीनामा देण्याचा निर्णय मागे घ्या अशी भावनिक साध या पत्रातून बागल यांनी घातली आहे.

## अक्कलकोट येथील माणिक पेठेत 'आपला दवाखाना'

**अक्कलकोट** : महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील माणिक पेठ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना उदघाटन सोहळा आ.कल्याणशेट्टी हस्ते संपन्न झाला.



यावेळी व्यसपीठावर आमदार सचिन कल्याणशेट्टी, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, मुख्यकार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, प्रांताधिकारी मनीषा आव्हाळे, जिल्हा आरोग्य अधिकारी सोनिया बागुल, तहसीलदार बाळासाहेब सिरसट, गटविकास अधिकारी सचिन खुडे, बालविकास प्रकल्प विकास अधिकारी सुवर्णा जाधव, मुख्याधिकारी पाटील, पोलीस निरीक्षक जिंतेंद्र कोळी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ अश्विन करजखेडे, पंचायत समिती कक्ष अधिकारी दयानंद परिचारक, दवाखाना वैद्यकिय अधिकारी डॉ. शिवलीला माळी उपस्थित होत्या.

अक्कलकोट शहरातील माणिक पेठ, खासबाग, म्हाडा कॉलनी आशा तीन ठिकाणी तर मैदर्गीत दोन , दुधनीत दोन असे एकाच तालुक्यात सात ठिकाणी ही योजना राबविण्यात येत आहे. यासाठी कोट्यवधी रुपये शासन खर्च केली आहे. हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेआपला दवाखाना महाराष्ट्र शासनाने राज्यात ३७१ ठिकाणी एकाच वेळी, एकाच दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ऑनलाइन डिजिटल पद्धतींने अनावरण करण्यात आले. मोफत तपासणी, उपचार होणार आहे. सदर योजना कष्ट्करी, गोरगरीब लोकांसाठी सुरू करण्यात आले आहे अशी माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ अश्विन करजखेडे यांनी दिली.

# पालखी मार्गावरील प्रकल्पग्रस्तांनी सहकार्य करावे : प्रांताधिकारी

सुराज्य/वेळापूर

**सदाशिवनगर व वेळापूर येथील उड्डाणपूलामुळे वाहतुकीची कोंडी होणार आहे. हे पूल तातडीने पूर्ण करावेत. माळशिरस येथे पालखी तळासाठी शेजारील कृषी खात्याची जागा द्यावी, वेळापूर पालखी तळावर सुलभ शौचालय बांधल्याने मानाच्या तीन दिंड्यांची जागा कमी झाली आहे. त्यांना जागा उपलब्ध करुन द्यावी, तोंडलेच्या दुपारच्या मुक्कामानंतर सोहळा पंढरपूरकडे जाण्यासाठी मार्ग करुन द्यावा अशी मागणी केली.**

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावरील कामे पूर्ण करण्याच्या दृष्टींने शासनस्तरावर जोरदार प्रयत्न सुरु आहेत. या कामाला गती देण्यासाठी या मार्गावरील प्रलंबित प्रकरणे लवकरच निकाली काढली जातील. या मार्गावरील प्रकल्पग्रस्तांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन अकलूज उपविभागाचे प्रांताधिकारी नामदेव टिळेकर यांनी केले.



प्रांताधिकारी टिळेकर यांनी तहसीलदार तुषार देशमुख, पालखी मार्गाचे प्रकल्प संचालक केशव घोडके, पोलिस उप अधिक्षक डॉ. बसवराज शिवपुजे, गटविकास अधिकारी विनायक गुळवे, संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे मालक बाळासाहेब आरफळकर, संस्थानचे मुख्य व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, राजाभाऊ चोपदार, पोंदे, पंचायत समितीचे कक्ष अधिकारी बी एच कदम, विस्तार अधिकारी कृषी पी.बी. शखरे, महसूलचे मंडल अधिकारी व्ही ए रणसुबे, तलाठी राजू कोगुरवार , राजेंद्र कोरके, सहाय्यक पोलिस निरीक्षक निलेश बागाव यांच्यासह संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाची पाहणी करुन पालखी व्यवस्थापक व प्रकल्पग्रस्तांच्या अडचणी समजून घेतल्या.

टिळेकर म्हणाले, संतांचे पालखी मार्ग सुकर करण्यासाठी प्रशासन सर्वतोपरी सहकार्य करेल. सोलापूर जिल्ह्यात माऊलींच्या पालखी सोहळयाचे दि . २४ जून रोजी आगमन होत आहे. पुर्वी सोहळयाचे सातारा-सोलापूर जिल्हा सीमेवर स्वागत होत होते. तेथे सध्या अडचण असल्याने धर्मपुरी हद्दीत स्वागत होइल व दुपारच्या भोजनासाठी सोहळा इरिगेशन बंगला येथे येइल. जिल्हा हद्द ते मोरोची पर्यंतचे काम तसेच मांडवे ओढा ते पुरंदावडे, वेळापूर चौक ते बसस्थानक, तोंडले येथील दुपारच्या भोजनानंतर पालखी जाण्यासाठीचा मार्ग या काही अडचणी आहेत. प्रकल्पग्रस्तांनी पुर्वी काय झाले यापेक्षा आता काय करता येइल.

यातून समन्वयाने काही मार्ग काढता येइल का? व पालखी मार्ग कसा सुरळीत होइल यासाठी सहकार्य करावे असे ते म्हणाले. ज्ञानेश्वर वीर यांनी सोलापूर जिल्हा स्वागत ते दसूर हा भाग माळशिरस तालुक्यात येतो. या तालुक्यात तीन गोल रिंगणे, धावा, भारुड असे विविध धार्मिक कार्यक्रम होतात. पाहण्यासाठी लाखोंची गर्दी जमते. यावेळी वेळापूरचे सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजी चव्हाण, रिपाइंचे तालुकाध्यक्ष मिलींद सरतापे, ग्रामपंचायत सदस्य हणमंत वायदंडे, माजी ग्रामपंचायत सदस्य दशरथ बनकर, ग्रामविकास अधिकारी दिपक गोरेसह प्रकल्पग्रस्त नागरीक उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष निवडीचा उद्या फैसला

सुराज्य/मुंबई

**राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्षपदाबाबत निर्णय घेण्यासाठी ५ मे रोजी निवड समितीची पहिली बैठक होणार आहे. शरद पवार यांनी यापुढे राष्ट्रवादी काँग्रेसचा अध्यक्ष राहाणार नसल्याचे २ मे रोजी जाहीर केले. त्यासोबत त्यांनी एक निवड समिती देखील सुचवली आहे. या निवड समितीची पहिली बैठक ५ मे रोजी होणार आहे.**

दरम्यान, ही बैठक ६ मे रोजी होणार होती. ती ५ मेला घ्यावी असे शरद पवार यांनी सुचवले आहे. निवड समिती जो निर्णय घेईल तो मला मान्य असेल असेही पवारांनी म्हटले आहे. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदाचे गुढ आणखी वाढले आहे.

शरद पवार यांनी काल पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमात यापुढे राष्ट्रवादी काँग्रेसचा अध्यक्ष असणार नाही, असा निर्णय घेतला असल्याचे जाहीर केले. त्यानंतर कार्यकर्त्यांनी त्यांच्या निर्णयाला जोरदार विरोध केला. राजकिय वर्तुळातही या निर्णयाने खळबळ उडाली. अध्यक्षपद सोडण्याचा निर्णय मागे घ्यावा यासाठी कार्यकर्ते हट्टाला पेटले तेव्हा पवारांनी मी दोन-तीन दिवसांत निर्णयाचा फेरविचार करेन असे जाहीर केले.

राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा देण्यापूर्वी वरिष्ठ नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना विश्वासात घेतलं पाहिजे होते, असे शरद पवार म्हणाले आहेत. पवारांनी त्यांच्या कालच्या भाषणादरम्यानच अध्यक्षपदासाठी एक समिती नेमण्याची सूचना केली. त्या समितीची ५ मे रोजी बैठक घ्यावी, त्या बैठकीत जो काही निर्णय होईल तो मला मान्य असेल, असंही शरद पवार म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतरची पवारांची ही पहिली प्रतिक्रिया आहे.

शरद पवार यांचा लोकशाहीवर विश्वास आहे, त्यांनी लोकांचा, राष्ट्रवादीतील नेते, आमदार, खासदार यांचे मत जाणून घेतले पाहिजे होते, असे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले होते. त्यावरही पवारांनी आज भाष्य केले आहे. ते म्हणाले, पक्षातील वरिष्ठांना आणि माझ्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले पाहिजे होतं असं मला वाटतं आहे. जर मी हा निर्णय सर्वांना विचारात घेऊन घेतला असता तर स्वाभाविकपणे सर्वांनी मला विरोध केला असता. म्हणून मी हा निर्णय माझ्या मनाशी एकमत करुन घेतला.



### अध्यक्षपदाचा निर्णय ५ मेला

अध्यक्ष निवड समितीची बैठक ही ६ मे रोजी घेण्याचे ठरले होते, ती बैठक ५ मेलाच घेण्याचे पवारांनी सांगितले आहे. त्यानुसार आता ५ मे रोजी बैठक होणार आहे. या बैठकीत जो काही निर्णय होईल तो मला मान्य असेल, असेही पवारांनी म्हटले आहे. त्यामुळे या बैठकीत जर शरद पवार यांनाच पुन्हा अध्यक्षपदी कायम राहाण्याचा निर्मय समितीने घेतला तर तो पवार मान्य करणार का? की राष्ट्रवादी काँग्रेसला नवीन अध्यक्ष मिळणार, हे आता ५ मेला ठरणार आहे.

### सुप्रिया सुळेंकडे राष्ट्रीय स्तरावरील जबाबदारी

पुढील वर्षी म्हणजेच २०२४मध्ये लोकसभेच्या निवडणुका होणार आहेत. भाजपाविरोधात विरोधकांनी कंबर कसली आहे. अशा वेळी शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेससारख्या महत्त्वाच्या पक्षाचे प्रमुखपद न सोडता, भाजपाविरोधी आघाडीचे नेतृत्व करावे, अशी विनंतीही शरद पवार यांना केली जाऊ शकते. जेणेकरून या पदासाठी सुप्रिया सुळे यांची निवड जरी झाली, तरी शरद पवारांचे मार्गदर्शन त्यांना मिळू शकेल. तूर्तास तरी, अजित पवार यांच्याकडे राज्याची सूत्रे तर, सुप्रिया सुळेंकडे राष्ट्रीय स्तरावरील जबाबदारी असेल, अशीच चिन्हे दिसत आहेत.

## सुप्रिया सुळे आघाडीवर



ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून बाजूला होण्याचा निर्णय घेतला आणि सर्वांनाच धक्का बसला. त्यांनी अध्यक्षपद सोडू नये, असा आग्रह पक्षातून होत आहे. मात्र, हे पद सोडण्याच्या निर्णयावर शरद पवार ठाम आहेत. पक्षाच्या काही ज्येष्ठ नेत्यांनी दिलेल्या संकेतानुसार राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदी पवार यांची कन्या सुप्रिया सुळे यांची निवड होण्याची शक्यता आहे.

सहसा त्या कुठल्या राजकिय व्यासपीठावर दिसत नाहीत, पण काल त्या होत्या. तसेच, त्यांनी आपल्या निर्णयावर ठाम राहण्याचा सल्ला त्यांनी शरद पवारांना दिला. एकूणच पवार कुटुंबीयांचा शरद पवार यांनी अध्यक्षपद सोडण्याचा निर्णय झाला असल्याने शरद पवार यांचा उत्तराधिकारी म्हणून त्यांच्या कन्या सुप्रिया सुळे यांच्याच नावावर शिक्कामोर्तब होण्याची दाट शक्यता आहे. अध्यक्षपद घरातच राहावे, यानुसार सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांचीच नावे चर्चेत असून अनेक नेत्यांनी सुप्रिया सुळे यांच्याच नावाला पसंती दिली आहे, अशी माहिती राष्ट्रवादीच्या एका बड्या नेत्याने दिली. शरद पवार यांनी महत्त्वाचा निर्णय जाहीर केला तेव्हा, त्यांच्यासमवेत शरद पवारांच्या पत्नी प्रतिभा पवार उपस्थित होत्या.

काही दिवसांपूर्वीच शरद पवार यांनी, आता भाकरी फिरवायची वेळ आली आहे, असे सांगत संघटनेतील बदलाचे संकेत दिले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या भाजपाप्रवेशाबद्दलची चर्चा लक्षात घेता, त्या दृष्टीने बदल केले जातील, अशी शक्यता वर्तविण्यात येत होती. मात्र, माझे सांगाती राजकिय आत्मकथा' या पुस्तकाच्या पुनर्प्रकाशनाच्या निमित्ताने अध्यक्षपदावरून निवृत्ती घेण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केले आणि सर्वांनाच धक्का बसला. मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये झालेल्या या कार्यक्रमात नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शरद पवार यांनी आपला निर्णय मागे घेण्याचा आग्रह धरला. त्यावर, दोन-तीन दिवसांत निर्णय घेऊ, असे त्यांनी सांगितल्याची माहिती सूत्रांनी दिली. बुधवारी रात्री उशिरा किंवा गुरुवार सकाळपर्यंत पक्षाच्या अध्यक्षपदाचा तीढा सुटलेला असेल असे राष्ट्रवादीच्या गोटातून सांगण्यात येत आहे.

पक्षाचा नवा अध्यक्ष निवडण्यासाठी एक समिती नेमण्यात आली असून प्रफुल्ल पटेल यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, सुनील तटकरे, जयंत पाटील, अजित पवार, हसन मुश्रीफ, सुप्रिया सुळे, जितेंद्र आव्हाड, अनिल देशमुख, धनंजय मुंडे, राजेश टोपे, फौजिया खान, जयदेव गायकवाड, धीरज शर्मा, सोनिया दूहन यांचा समावेश आहे. सध्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये शरद पवार हे स्वत: उपस्थित असून त्यांची अन्य नेत्यांशी चर्चा सुरू आहे. मात्र, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे उपस्थित नसल्याने शरद पवार यांनी त्यांना फोन करून मुंबईत येण्यास सांगितले. ते संध्याकाळपर्यंत मुंबईत पोहोचणार असून त्यानंतर सिल्व्हर ओक या शरद पवारांच्या निवासस्थानी संध्याकाळी पाच वाजता बैठक होईल, असे सांगण्यात येते.

सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाला विरोध करून काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या शरद पवार यांनी १० जून १९९९ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. त्यामुळे येत्या १० जूनला हा पक्ष २५व्या पक्षात पदार्पण करणार आहे, तोपर्यंत किंवा राज्यसभा सदस्यत्वाची अद्याप तीन वर्षं बाकी असल्याने, तोपर्यंत अध्यक्षपदाची सूत्रे हाती ठेवावीत, अशी विनंती शरद पवार यांना सर्वच नेत्यांनी केली.



## वाटाघाटी फिस्कटल्या-बीडीओ संपावर; कामकाज विस्कळीत

वर्धा : शासनाने महात्मा गांधी रोजगार हमी योजनेची जबाबदारी ग्रामसेवकांकडून काढत ती गटविकास अधिकाऱ्यांकडे सोपविली. तरीही त्यांना असक्षम असे म्हटल्याने गटविकास अधिकारी संपावर गेलेत. हा निर्णय रद्द करावा म्हणून राज्यातील साडेतीनशेवर गट विकास अधिकारी यांनी दहा एप्रिलपासून काम बंद आंदोलन पुकारले आहे. सतत वाटाघाटी सुरू आहेत, पण मार्ग निघाला नासल्याचे संघटनेचे नेते शिंदे यांनी सांगितले. ग्रामसेवकांची स्वाक्षरी आवश्यक नसल्याचे पत्र आहे. त्यामुळे रोजगार सेवकाकडून थेट गटविकास अधिकारींकडे कामाची व मजुरीची मागणी केली जाणार. त्यामुळे ग्रामपंचायतीवर कोणतीच जबाबदारी नाही. गैरप्रकार आढळून गुन्हा दाखल करण्याचे प्रमाण वाढत असल्याने गटविकास अधिकारी यांच्यावरील कामाचा ताण वाढत आहे. या निर्णयात सुधारणा करण्याची संघटनेची मागणी आहे. या आंदोलनात सहायक गटविकास अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, प्रभारी गटविकास अधिकारी सहभागी झाले आहेत. राज्यभरातील पंचवीस हजारावर ग्रामसेवकांवर कामाचा ताण आहे, असे म्हणतात. मग केवळ साडेतीनशे गट विकास अधिकारी वर्गाने हे काम करावे, हे कसे गृहीत धरता, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## समलिंगी जोडप्यांच्या समस्या निवारण्यासाठी समिती नेमणार

नवी दिल्ली : समलिंगी विवाहाला भारतात कायदेशीर परवानगी मिळावी याकरता सर्वोच्च न्यायालयात वादळी सुनवाणी सुरू आहे. याचिकाकर्त्यांचे वकिल अभिषेक सिंघवी यांनी याप्रकरणी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे ठरवले आहे. तर, दुसरीकडे हा कायदा लागू करण्यास केंद्र सरकार अनुत्सुक असल्याचं चित्र स्पष्ट होत आहे. परंतु, समलिंगी जोडप्यांच्या समस्यांचे निवारण करण्याकरता कॅबिनेट सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यास केंद्र सरकारने तयारी दर्शवली आहे. केंद्राने बुधवारी यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात माहिती दिली. समलिंगी विवाहाला कायदेशरी परवानगी देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या घटनापीठासमोर ही सुनावणी सुरू असून केंद्र सरकारच्या वतीने जनरल सॉलिसटीर तुषार मेहता युक्तीवाद करत आहेत. बुधवारी त्यांनी न्यायालयात माहिती दिली की, सरकार सकारात्मक आहे. आम्ही ठरवलं आहे की समलिंगी जोडप्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी एकापेक्षा जास्त मंत्रालयात समन्वय असणे गरजेचे आहे. त्यामुळे कॅबिनेट सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली जाईल. समलिंगी जोडपी किंवा याचिकाकर्ते या समितीकडे जाऊन त्यांचे प्रश्न मांडू शकतात. जास्तीत जास्त समस्यांचे निवारण करण्याचा प्रयत्न केला जाईल, असंही ते पुढे म्हणाले.

## रशियाचे अध्यक्ष पुतिन यांना संपवण्यासाठी युक्रेनचा ड्रोन हल्ला

रशिया : युक्रेनने रशियावर ड्रोन हल्ला केल्याचा आरोप रशियाने केला आहे. युक्रेनने राष्ट्रपती व्लादिमिर पुतिन यांना जीवे मारण्यासाठी क्रेमलिनवर ड्रोन हल्ला केला असल्याचा दावा क्रेमलिन सरकारने केला आहे. रशियन वृत्तसंस्थेच्या हवाल्याने यासंबंधीचं वृत्त रॉयटर्सने प्रसिद्ध केलं आहे. क्रेमलिनने या हल्ल्याला प्लान्ड टेररिस्ट क्शन म्हटलं आहे. या हल्ल्यात ड्रोन्सचा वापर केला असल्याचं रशियाने म्हटलं आहे. रशियन सुरक्षा यंत्रणेने हल्ल्यासाठी वापरलेले दोन्ही ड्रोन्स नष्ट केले आहेत. रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन पूर्णपणे सुरक्षित असल्याचं क्रेमलिनने म्हटलं आहे. तसेच अध्यक्षांच्या इमारतीचं कोणत्याही प्रकारचं नुकसान झालेलं नाही. रशियाचे अध्यक्ष सुरक्षित असून त्यांचे नियोजित कार्यक्रम सुरू आहेत. त्यांच्या कार्यक्रमांमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात आलेला नाही. दरम्यान, क्रेमलिनने युक्रेनवर ड्रोन हल्ल्याचा आरोप केला असला तरी या हल्ल्याचा कोणताही पुरावा त्यांनी सादर केला नाही. दुसऱ्या बाजूला युक्रेनचे राष्ट्रपती वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी क्रेमलिनवरील ड्रोन हल्ल्याबाबत एक निवेदन जारी केलं आहे. या हल्ल्याशी युक्रेनचा संबंध नसल्याचं युक्रेन सरकारने म्हटलं आहे.

## सोलापूरचे अन्नसुरक्षा अधिकारी कुचेकर रजेवर

सुराज्य/सोलापूर

सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ पोलीस ठाण्यात सोलापूरचे अन्नसुरक्षा अधिकारी प्रशांत शशिकांत कुचेकर यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर कवठेमहांकाळचे पोलीस सोलापुरात दाखल झाले असून जिल्हाधिकारी कार्यालयातील अन्न-औषध प्रशासन कार्यालयात जावून चौकशी केली मात्र सध्या कुचेकर रजेवर आहेत,असे समजले. अन्न-औषध प्रशासन अधिकाऱ्यांनी याबाबतचा अहवाल वरिष्ठ पातळीवर माहितीस्तव अन्न-औषध आयुक्तांना सादर केला आहे.

रविवारी रात्री नागज फाटा येथे गुटख्याच्या पोत्यांनी भरलेले दोन ट्रक पकडून एक कोटी ३५ लाख रुपये किमतीचा गुटखा जप्त केला होता. या प्रकरणात सोलापूरचे अन्नसुरक्षा अधिकारी प्रशांत शशिकांत कुचेकर (रा. सदर बझार, सोलापूर शहर) यांच्यासह चार जणांवर गुन्हा दाखल झाला होता. पोलीस हवालदार दीपक प्रकाश गायकवाड यांनी फिर्याद दिली आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर कवठेमहांकाळचे पोलीस मंगळवारी सोलापुरात आले होते. त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रशासकीय इमारती मधील अन्नऔषध कार्यालयात जाऊन चौकशी केली मात्र गुन्हा दाखल होण्यापूर्वी कुचेकर रजेवर गेले असल्याची माहिती मिळाली.

**चौकशीसाठी कवठेमंहाकाळाचे पोलीस शहरात**

कुचेकर यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर याबाबतची प्राथमिक माहिती प्रशासनाच्या वतीने वरीष्ठ पातळीवर आयुक्तांना देण्यात आली आहे.

वास्तविक पाहता कुचेकर हे गुटख्याचा काळाबाजार करणाऱ्यांचा बळी असल्याची चर्चा प्रशासनात आहे. कुचेकर यांनी सोलापूर जिल्ह्यात सलग तीन वर्ष धडक कारवाई करत गुटख्याचा काळाबाजर करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली होती. त्यामुळे कुचेकर यांच्या कारवाईचा धसका गुटख्याचा काळाबाजर करणाऱ्यांनी घेतला होता. त्यामुळे कटकारस्थान करून कुचेकर यांना अडकावण्यात आल्याचे बोलले जात आहे. कुचेकर यांनी सन २०२०-२१ मध्ये १५ धाडी घालत ३६ लाख ३६ हजारचा तर सन २०२१-२२ मध्ये ३६ ठिकाणी धाडीघालत १ कोटी ७७ लाख तर २०२२-२३ मध्ये ६ धाडी घून ८६ लाखांचा बेकायदा गुटखा जप्त करत फौजदारी गुन्हे दाखल केले होते. त्यामुळे बेकायदा गुटख्यांचा काळाबाजार करणाऱ्यांचे धाबे दणाणले होते. त्यामुळे या प्रकरणात कुचेकर यांना अडकवण्यात आल्याची चर्चा प्रशासनात आहे.

## न्यायालयात गोळीबार घडविलेल्या गुंडाचा तिहारमधील हल्ल्यात मृत्यू

नवी दिल्ली : दिल्लीमध्ये गाजलेल्या रोहिणी न्यायालय गोळीबार प्रकरणातील आरोपी टिल्लू ताजपुरियाचा मंगळवारी खून झाला. तो शिक्षा भोगत असलेल्या तिहार तुरुंगात गोगी टोळीच्या सदस्यांनी त्याचा खून केल्याची माहिती तुरुंग अधिकाऱ्यांनी दिली.

टिल्लू ताजपुरियाला ठेवलेल्या कोठडीचे गज कापून त्याच्यावर तीक्ष्ण हत्यारांनी वार करण्यात आल्याचे सांगण्यात आले. विशेष म्हणजे त्याची कोठडी सुरक्षेच्या दृष्टीने उच्च जोखमीच्या भागात असतानाही त्याच्यावर हल्ला करण्यात मारेकऱ्यांना यश आले.

सुनील ऊर्फ टिल्लू ताजपुरियावर (३३ वर्षे) २०२१ साली दिल्लीतील रोहिणी न्यायालयात गोळीबार करून जितेंदर गोगीचा खून केल्याचा आरोप होता. याच गोगी टोळीच्या दीपक ऊर्फ तितर, योगेश ऊर्फ टुंडा, राजेश आणि रियाझ खान या चार सदस्यांनी त्याच्यावर हल्ला केल्याचे सांगण्यात आले. हल्ल्यानंतर त्याला बेशुद्ध अवस्थेत दीनदयाळ उपाध्याय रुग्णालयात नेण्यात आले, तिथे उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला असे तुरुंगातील अधिकाऱ्यांनी सांगितले. टिल्लू ताजपुरियाची कोठडी तळमजल्यावर होती आणि चौघा मारेकऱ्यांची कोठडी पहिल्या मजल्यावर होती. त्यांनी सकाळी सव्वासहा वाजता चादरींचा वापर करून तळमजल्यावर उड्या मारल्या आणि ताजपुरियाच्या कोठडीचे गज कापले.

## रस्त्यांची कामे वेगाने आणि गुणवत्तापूर्ण होणार

**महामंडळाची होणार स्थापना**

सुराज्य/मुंबई



राज्य मंत्रिमंडळाची आज मंत्रालयात बैठक पार पडली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. त्यानुसार, राज्यातील रस्त्यांची कामे गुणवत्तापूर्ण आणि वेगाने होण्याकरता राज्य सरकारने महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्यात विविध ठिकाणी रस्त्यांची कामे सुरू आहेत. मुंबईत ४०० किमीच्या रस्त्यांचे काम सुरू आहे. तर, अनेक ठिकाणीही कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांवर देखरेख ठेवण्याकरता महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बुधवारी मंत्रालयात घेतलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून यामुळे रस्त्यांची कामे गुणवत्तापूर्ण आणि वेगाने होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे या महाडमंळाच्या निर्णयाची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान, मंगळवारी (२ मे) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वन्यजीव मंडळाची २० वी बैठक झाली. राज्यामध्ये वन्यजीव व्यवस्थापन प्रभावीपणे करण्यात येत असल्याने राज्यातील सहा व्याघ्र प्रकल्प, संरक्षित क्षेत्र व संरक्षित क्षेत्राच्या बाहेर वाघासह वन्यप्राण्यांची वाढ झाली आहे.

भारतीय व्याघ्र प्रगणना २०२२ साठी करण्यात आलेल्या कॅमेरा ट्रॅपमध्ये वाघांची संख्या ३१२ वरून ३९० झाली आहे. व्याघ्र प्रकल्पांच्या व्यवस्थापन प्रभावी मूल्यांकनात पेंच व्याघ्र प्रकल्प देशातील पहिल्या दहा प्रकल्पामध्ये आहे. त्याबद्दल राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

## पुस्तकांच्या गावांची योजना रखडली

**निधीअभावी विलंब होत असल्याची चर्चा**



सुराज्य/मुंबई

### गावांसाठी अजून पाहणीच...

मराठी भाषा विभागाचे अवर सचिव अजय भोसले यांनी या संदर्भात अजूनही पाहणी सुरू असल्याची माहिती दिली. या पाहणीचा कालावधी निश्चित नसल्याचेही ते म्हणाले. राज्य मराठी विकास संस्थेकडून पाहणीचा अहवाल अपेक्षित आहे. दरम्यान, निधीचा प्रश्न निर्माण होणार नसल्याचेही भोसले यांनी स्पष्ट केले.

महाबळेश्वरजवळील भिलारप्रमाणे राज्यातील इतर सहा महसुली विभागांमध्ये पुस्तकांचे गाव सुरू करण्याचा प्रकल्प रखडला आहे. याबाबत २५ मार्च २०२२ रोजीच्या शासन निर्णयानंतर या गावांच्या पाहणीचा अहवाल अद्यापही मिळाला नसल्याचे मराठी भाषा विभागाकडून सांगण्यात येत आहे.

वाचन संस्कृतीला चालना मिळावी यासाठी भिलार येथे पुस्तकांचे गाव सन २०१७ मध्ये अस्तित्वात आले. भिलारच्या या पुस्तकांच्या गावाला गुरुवारी चार मे रोजी सहा वर्षे पूर्ण होत आहेत. गेल्या वर्षी मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने भाषामंत्री सुभाष देसाई यांनी राज्यातील इतर पाच पुस्तकांच्या गावाची घोषणा केली होती. त्यानंतर २५ मार्च २०२२च्या शासन निर्णयानुसार चार महसुली विभागांमध्ये संभाजीनगर जिल्ह्यात वेरुळ, गोंदियात नवेगाव बांध, सिंधुदुर्गात पोंभुर्ले आणि सांगली जिल्ह्यात अंकलखोप (औदुंबर) येथे पुस्तकांचे गाव या योजनेचा विस्तार करण्यासंदर्भात मान्यता देण्यात आली.


गेल्या वर्षी एप्रिलमध्ये राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक संजय पाटील यांनी पुस्तक निवड समिती, दालनांसाठी सोयी सुविधांसाठी ई-टेंडर प्रक्रिया सुरू असल्याचे एप्रिल अखेरीस बोलताना स्पष्ट केले होते.

मात्र, एक वर्ष उलटून गेले तरी या ठिकाणी पुस्तकांचे गाव प्रकल्प प्रत्यक्षात आलेला नाही. निधीअभावी हा विलंब होत असल्याची चर्चा आहे.

# १० मिनिटांचे बोलणे, भावाने तीन गोळ्या झाडल्या

सुराज्य/मुंबई

**२२ एप्रिल २००६... प्रवीण महाजन हे भाऊ प्रमोद महाजन यांच्या वरळीतील घरी पोहोचले.. दोघा भावांमध्ये १० मिनिटं बोलणं झालं आणि तीन गोळ्यांचा आवाज... हा आवाज ऐकून प्रमोद महाजन यांच्या पत्नी रेखा महाजन तिथे पोहोचल्या... समोर प्रमोद महाजन रक्ताच्या थारोळ्यात पडले होते... यानंतर १० दिवस प्रमोद महाजनांनी मृत्यूशी झुंज दिली आणि ३ मे २००६ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला... पूनम महाजन यांचे वडील, भाजपचे लोकप्रिय नेते आणि अटबिहारी वाजपेयी यांचे उत्तराधिकारी असलेल्या प्रमोद महाजन यांच्या हत्येचं गूढ काय आहे?**



२२ एप्रिल २००६ च्या दिवशी प्रमोद महाजन यांच्या वरळीतील राहत्या घरी त्यांचे भाऊ प्रवीण महाजन सकाळी ७.३० च्या सुमारास आले. आदल्या रात्रीच प्रमोद महाजन आणि प्रवीण महाजन यांच्यात वाद झाला होता. प्रवीण यांनी येताच तक्रारी करणं सुरु केलं. प्रवीण यांना वाटायचं की प्रमोद यांच्या ओळखीनं त्यांच्या आजूबाजूच्या लोकांनी कामधंद्यात फायदा करून चांगले पैसे कमावले होते, मात्र प्रवीण यांना प्रमोद हे बाजूला ठेवतात.

शिवाय प्रमोद त्यांना भेटीसाठी वेळ देत नाही आणि त्यांना टाळण्याचा प्रयत्न करतात असा प्रवीण यांचा समज होता. साधारण १० मिनिटं हे बोलणं झाल्यानंतर प्रमोद महाजन यांनी जर काही महत्वाचं बोलायचं असेल तर असिस्टंटकडून अपॉइंटमेंट घेऊन भेटायला यायला सांगितलं. ही गोष्ट प्रवीण यांना लागली आणि त्यांनी खिशातील पिस्तूल काढली आणि प्रमोद महाजन यांच्यावर गोळ्या झाडल्या. प्रमोद महाजन यांच्या पत्नी गोळ्यांचा आवाज ऐकून तिथे पोहोचल्या, यानंतर प्रवीण महाजन तिथून निघून गेले. रेखा महाजन यांनी तातडीनं त्याच इमारतीत राहणाऱ्या गोपीनाथ मुंडे यांना बोलावलं आणि प्रमोद यांना रुग्णालयात दाखल केलं.

### रुग्णालयात डॉक्टरांचे शर्थीचे प्रयत्न

रुग्णालयात प्रमोद महाजन यांना वाचवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरु होते तेव्हा दुसरीकडे प्रवीण महाजन ट्रॅफिक पोलीस हेडक्वार्टर्समध्ये पोहोचले आणि घडलेली हकिकत सांगितली. त्यानंतर पोलिसांनी त्यांना वरळी पोलिस स्टेशनला जाण्यास सांगितलं. प्रवीण यांनी वरळी पोलीस स्टेशनला जाऊन मी प्रमोद महाजन यांना गोळ्या मारल्या, सरेंडर करण्यास आलो आहे असं सांगितलं.

यानंतर प्रवीण महाजन यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली. दुसरीकडे प्रमोद महाजन यांना वाचवण्यासाठी डॉक्टर शर्थीचे प्रयत्न करत होते. मात्र अखेर १३ दिवसांनी सगळे प्रयत्न निष्फळ ठरले आणि ३ मे २००६ ला प्रमोद महाजन यांची प्राणज्योत मालवली. प्रवीण महाजन यांच्यावर हत्येचा प्रयत्नाचा असलेला गुन्हा आता बदलून हत्येचा गुन्हा झाला होता. मात्र प्रवीण महाजन यांच्या चेहऱ्यावर तसूभरही दुःख नव्हतं. हे प्रकरण न्यायालयात पोहोचलं तेव्हा सगळ्यांना एकच प्रश्न होता की या हत्येमागे नेमकं कारण काय होतं? ही हत्या रागात केली की आधीच प्लॅन करून करण्यात आली याबाबतही चौकशी करण्यात आली.

# वज्रमूठ हातातील वाळूप्रमाणेच निसटणार

## ▶ सुजय विखे-पाटलांचा महाआघाडीला टोला

✔ सुराज्य/पंढरपूर

**समुद्राची वाळू मुठीमध्ये जेवढी जोरात आवळली जाते तेवढी त्यातून वाळू निसटून जाते. वज्रमुठचे देखील असेच होणार आहे, असा टोला भाजपाचे खासदार सुजय विखे-पाटील यांनी लगावला.**



श्री विठ्ठल रूक्मिणी दर्शनासाठी आले असता विखे-पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी युवक नेते प्रणव परिचारक, राहुल परचंडे, अक्षय वाडकर यांनी त्यांचा पंढरपूर भाजपाच्या वतीने सत्कार केला.

सध्या राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या पक्षाच्या अध्यक्षपदाच्या राजीनाम्याचा विषय गाजत आहे. या विषयावर त्यांनी, हा राष्ट्रवादीचा अंतर्गत प्रश्न असल्याचे सांगितले. अध्यक्ष बदलणे ही एक प्रक्रिया आहे. भाजपामध्ये देखील नेहमीच सुरू असते. परंतु पवार यांच्या राजीनाम्याच्या घोषणे नंतर महाविकास आघाडीच्या नियोजीत वज्रमुठ सभा रद्द करण्यात आल्या आहेत.

यावर विखे-पाटील यांनी, वाळू हातातून निसटते तसेच काहीसे सुरू आहे. थोडे थांबा तुम्हाला सर्व कळेल असे सूचक वक्तव्य केले. दरम्यान काही दिवसापूर्वी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या नावाची चर्चा सुरू होती. यावर त्यांनी, अशा चर्चा करणारे नक्कीच आमचे हितचिंतक नाहीत या शब्दात नाराजी व्यक्त केली. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली राज्यात जोरदार विकास सुरू असून आम्हाला पक्षाने योग्य तो न्याय दिला आहे.

परंतु काहीजण वेगळ्या मानसिकतेतून अशा वावड्या उठवत असल्याची टीका केली. सुजय विखे यांच्या जागेवर भाजपामधून काही जणांनी दावा केला जात आहे. यावर त्यांनी, २०२४ साली आम्हाला पुन्हा पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी यांना निवडून द्यायचे आहे. यामुळे येथे विखे-पाटील असो अथवा कोणी काही फरक पडणार नाही. जो उमेदवार असेल तो मोठ्या मताने विजयी होणार असा विश्वास व्यक्त केला.

### पृथ्वीराज चव्हाणांनीच राष्ट्रवादीचा निम्मा कार्यक्रम केला होता

काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी राष्ट्रवादीची भाजपा समवेत चर्चा सुरू आहे असे वक्तव्य केले होते. यावर विखे-पाटील यांनी, पृथ्वीराज चव्हाण यांचे योगदान फार मोठे आहे. मुख्यमंत्री असताना त्यांनी राष्ट्रवादीचा निम्मा कार्यक्रम केला होता आता देखील तेच राहिलेला कार्यक्रम करणार. या शब्दात खिल्ली उडवली.

# पवार सोलापुरातली भाकरी फिरवतील असे वाटले होते : कोल्हेंची मिश्किल टिपणी

✔ **सोलापूर** : राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या राजीनाम्याचे पडसाद सोलापुरातही उमटले आहेत. राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष भारत जाधव यांनी सोलापुरातील सर्व पदाधिकारी राजीनामा देतील, असे बैठकीत सांगितले. यावर दिलीप कोल्हे यांनी पवारांनी भाकरी फिरवण्याचे विधान केले होते ते सोलापुरातील भाकरी फिरवतील असे वाटले होते, अशी मिश्किल टिप्पणी केली.

महापालिकेत एका कामासाठी आले असता कोल्हे यांनी पत्रकारांशी बोलताना वरील वक्तव्य केले. कोल्हे त्यांनी काही महिन्यांपूर्वी राष्ट्रवादी पक्षाला रामराम करत शिंदे यांच्या शिवसेनेमध्ये प्रवेश केला होता.



कोल्हे हे राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते होते. शरद पवार, आर. आर. आर पाटील यांचे ते कट्टर समर्थक मानले जात होते. मात्र राष्ट्रवादीमधील अंतर्गत गटबाजीला कंटाळून त्यांनी शिवसेनेची वाट धरली होती. शिवसेनेमध्ये प्रवेश करताना त्यांनी राष्ट्रवादीवर त्यातल्या त्यात जाधव यांच्यावर टीका केली होती. जाधव दहा वर्षे शहर अध्यक्ष पद सोडत नाहीत. तसेच युवक अध्यक्ष जुबेर बागवान यांचा कार्यकाळ संपून अनेक वर्ष झाली, तसेच युवक अध्यक्ष पदाचा त्यांचा वय देखील संपलं आहे. तरी सुद्धा दुसऱ्याला संधी दिली जात नाही अशी नाराजी त्यांनी व्यक्त केली. तसेच पक्षाचे निरीक्षक शेखर माने यांच्यावरही त्यांनी टीका करत केली होती.

हाच धागा पकडत कोल्हे पवार यांच्या राजीनाम्यावर बोलताना म्हणाले, पवार काय करतील हे कोणाला कळत नाही. मात्र ते सोलापुरातील भाकरी फिरवणार असे वाटत होते मात्र त्यांनी तसे केले नाही. पवार यांच्या समर्थनात झालेल्या बैठकीत केवळ १९ जण उपस्थित होते यावरूनच राष्ट्रवादीची अवस्था काय आहे असे सांगत त्यांनी मिश्किल टिप्पणी केली.

## मयत व्यक्तीच्या नावाने वीज कनेक्शन घेऊन फसवणूक

✔ **सोलापूर** : मयत व्यक्तीच्या नावे वीज कनेक्शन घेऊन महावितरण कंपनीची फसवणूक केल्याप्रकरणी दोघा विरोधात सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. युन्नूस मकबुल सय्यद व शरद कुमार घोडके (रा. दोघे सोलापूर) यांनी संगनमत करून आर्थिक फायदा मिळवण्याकरिता वराह व्यावसायिक सहकारी संस्थेच्या भाडे तत्त्वावर घेतलेल्या खोलीसाठी मयत व्यक्ती कुमार राम घोडके यांच्या नावाने बनावट प्रतिज्ञापत्र तयार करून ते खरे असल्याचे भासवून वीज कनेक्शन घेतले.महावितरण कंपनीला ही बाब लक्षात आल्यानंतर वराह व्यावसायिक सहकारी संस्थेचे सचिव विजय शंकर घोडके यांनी दोघाविरोधात सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.घटनेचा अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक मुल्ला हे करत आहेत.

## मागील भांडणाचा राग मनात धरून मारहाण

✔ **सोलापूर** : बसव जयंती मिरवणुकीत झालेल्या भांडणाच्या कारणावरून अमोल भारत माने यास मारहाण केल्याप्रकरणी ७ जणांच्या विरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. १ मे रोजी दुपारी




साडेचार वाजता सुमारास गणपती मंदिराजवळ रमणनगर सोलापूर येथे फिर्यादी अमोल भारत माने (रा.खैरादी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) हे आपल्या मामा बरोबर बोलत बसले असताना संशयित आरोपी आकाश सोनकांबळे, संतोष सोनकांबळे,विजय तारापुरे, संकेत डंके, सचिन घागरे, अमर मकाई व तेजस लोहार (रा.सर्वजण सोलापूर) हे आले व सर्वांनी मिळून फिर्यादीस व त्यांच्या मामास शिवीगाळ करून बॅटने मारहाण केली. एमआयडीसी पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल झाला आहे.

## उळे येथे ट्रक अडवून तिक्ष्ण शस्त्राने हल्ला; मध्यप्रदेशचे दोघे जखमी

✔ **सोलापूर** : बटाटे वाहतुकीचा ट्रक अडवून दोघांना तीक्ष्ण शस्त्र आणि लोखंडी रॉडने मारहाण करीत १० हजार रुपये लुटण्याची घटना तुळजापूर मार्गावरील उळे (ता. उत्तर सोलापूर) येथे सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणात सोलापूर तालुक्याच्या पोलिसांनी चौघा अनोळखी इसमाविरुद्ध दरोड्याचा गुन्हा दाखल केला आहे. जितेंद्र शोभाराम सिंह (वय ३१) आणि समीर रफिक खान (वय ३२ दोघे रा.भिंड, मध्यप्रदेश) अशी जखमींची नावे आहेत. त्यापैकी समीर शेख याला गंभीर अवस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. ते दोघे ग्वाल्हेर येथून ट्रक मध्ये बटाटे भरून तुळजापूर मार्गे दावणगिरी (कर्नाटक) येथे निघाले होते. उळे येथील राजधानी धाब्याजवळ जेवण करून रात्री १० वाजेच्या सुमारास ते पुढच्या प्रवासासाठी निघाले होते. वाटेत जॅक पडल्याने ट्रक उभा करून ते खाली उतरले होते. त्यावेळी चौघा अनोळखी दरोडेखोरांनी त्यांना बेदम मारहाण केली आणि त्यांच्या खिशातील १० हजार रुपये घेऊन पसार झाले. या घटनेची फिर्याद जितेंद्र सिंह यांनी पोलिसात दाखल केली . पुढील तपास फौजदार निंबाळकर करीत आहेत.

# सोलापूर विद्यापीठाच्या प्र.कुलगुरूपदी डॉ.कामत

✔ **सोलापूर** : डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी डॉ. आर. के. कामत यांची राज्यपाल रमेश बैस यांनी निवड केली आहे.

या आशयाचा आदेश कुलपती कार्यालयाकडून नुकताच वितरित करण्यात आला आहे. कामत हे गेल्या नऊ महिन्यांपासून डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी शिवाजी विद्यापीठामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता म्हणून कार्यरत होते. तसेच इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक शास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक आणि विभागप्रमुख काम केले आहे. त्यांनी नामांकित जर्नल्समध्ये २०० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित केले आहेत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर १६ पुस्तके लिहिली आहेत. त्यांनी आतापर्यंत २० विद्यार्थ्यांना पीएच. डी.साठी मार्गदर्शन केले आहे.



माजी राष्ट्रपति डॉ. ए. पी. जे. कलाम यांच्या हस्ते विशेष सन्मानित केले होते. रुसा या योजनेच्या अंतर्गत डॉ. होमी भाभा विद्यापीठाचे महाराष्ट्रातील पहिले समूह विद्यापीठ म्हणून २०१९मध्ये स्थापना केली होती. व त्याचे पहिले नियमित कुलगुरू म्हणून डॉ. कामत यांनी ऑगस्ट २०२२मध्ये कार्यभार स्वीकारला होता. सध्याच्या कुलगुरू डॉ. मृणलीनी फडणवीस यांचा कार्यकाल दिनांक ०५ मे २०२३ रोजी संपत असल्याने माननीय राज्यपालांनी डॉ. कामत यांची नेमणक केली.

## राजस्व नगरात घरफोडी

✔ **सोलापूर** : कार्यक्रमा निमित्त बाहेर गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने ही संधी साधत घराच्या दरवाजाचा कडी-कोंयडा ऊचकटून कपाटात ठेवलेले १ लाख ६८ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. या घटनेची हकीकत अशी की, राजस्व नगरात राहणाऱ्या प्रतिभा किशोर शेळके (वय-४३) या आरटीओ ऑफिस येथे कार्यक्रम असल्याकारणाने गेल्या होत्या. ही संधी साधत चोरट्याने ही चोरी केली. विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.




# बँकांनी काळजीपूर्वक कर्ज पुरवठा करावा : मेहता

### जिल्हा नागरी बँक्स असोसिएशनच्या वतीने चर्चासत्र

✔ सुराज्य/सोलापूर

सहकारी बँकांनी कर्जवाटप करताना कायदेशीर बाबी तपासून तसेच कर्जदाराची पत पाहून कर्जपुरवठा करावा,असे आवाहन सारस्वत बँकेचे निवृत्त सरव्यवस्थापक प्रमोद मेहता यांनी केले. सोलापूर जिल्हा नागरी बँक्स असोसिएशनच्या वतीने आयोजित केलेल्या एका चर्चासत्रात ते बोलत होते.

मेहता पुढे म्हणाले, कर्ज ज्या कारणासाठी दिला आहे, त्याच कारणासाठी कर्जांचा विनियोग झालेला आहे का नाही याची शहानिशा बँकेतील कर्जवभाग प्रमुखांनी करणे गरजेचे आहे. प्रत्येक प्रायोरिटी सेक्टर हे विकर सेक्शन कर्जे नसतात, परंतु प्रत्येक ब्रोकर सेवशन कर्जे हे प्रायोर्टी सेक्टर असतात,असेही ते म्हणाले. पंढरपूर मर्चंटस बँकेचे सुनील हिरेमठ म्हणाले, कर्जाची वसुली झाली तरच बँक जीवित राहते. संचालक मंडळ कर्ज वसुलीच्या वेळी कर्जदाराला मदत न करता बँकेला सहकार्य करण्याची भूमिका घ्यावी.

सोलापूर जिल्हा बँक्स असोसिएशनचे चेअरमन अशोक लुणावत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संचालक दीपक मुनोत यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. संचालक दिनकर देशमुख यांनी आभार मानले. दुपारच्या सत्रात बँकिंग प्रगती मासिकाचे मुख्य संपादक राजेंद्र कोठावळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. संचालक अशोक सुरवसे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन बँक्स् असोसिएशनचे सी.ई.ओ. शुभांगी ढवळे यांनी केले.

# डॉ.जाधव यांच्या दबावाखाली आम्ही तक्रार केली

## कर्मचाऱ्यांचे खुलासे आले समोर

✔ सुराज्य/सोलापूर

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेना गटाचे जिल्हाप्रमुख मनीष काळजे यांच्या विरोधात जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागातल्या काही कर्मचाऱ्यांनी गंभीर तक्रारी केल्या होत्या. या तक्रारी तत्कालीन आरोग्य अधिकारी डॉक्टर शितल जाधव यांच्या दबावाखाली केल्या असल्याचा खुलासा आता अनेक कर्मचाऱ्यांनी केला आहे.





मनीष काळजे यांच्या हस्तक्षेपामुळे तत्कालीन आरोग्य अधिकारी डॉक्टर शितल जाधव यांचे निलंबन झाले. त्यांचा आरोग्य विभागाच्या कामकाजात हस्तक्षेप का? असा प्रश्न करत त्यांच्या भीतीपोटी आम्ही कसे काम करायचे असे अनेक राज्य नवनिर्मित नर्सेस संघटनेने लेखी पत्र केले होते. या प्रकरणाला आता वेगळे वळण प्राप्त झाले आहे. ज्या कर्मचाऱ्यांनी मनीष काळजे यांच्या लेखी तक्रारी केल्या होत्या, त्यातील काही कर्मचाऱ्यांनी तत्कालीन आरोग्य अधिकारी डॉक्टर शितल जाधव यांच्या दबावाखाली आम्ही हे अर्ज केले असे लेखी दिले आहे तसेच काही कर्मचाऱ्यांनी तर आम्ही काळजे यांना ओळखत नाही त्या अर्जावर आमच्या बोगस सह्या केल्याचेही सांगितले आहे.

**बदनामीबद्दल न्यायालयात जाणार : काळजे**

यांप्रकरणी प्रतिक्रिया देताना काळजे म्हणाले, तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर शितल जाधव हे आपल्या गैरकारभारामुळे निलंबित झाले आहेत. त्यांच्या निलंबनाशी आपला कोणताही संबंध नव्हता, जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामध्ये आपण कोणताही हस्तक्षेप केला नाही हे या खुलाशापत्रांवरून सिद्ध झाले आहे. परंतु नवनिर्मित नर्सेस संघटनेच्या पत्रामुळे जी माझी बदनामी झाली त्याबद्दल आपण न्यायालयात जाऊन कायदेशीर कारवाई करणार आहे.

### भाजपाचे प्रदेश पदाधिकारी जाहीर

# शहरातून काळे तर जिल्ह्यातून वाघमारे कार्यकारिणीवर

**मनीष देशमुख निमंत्रित तर उदय पाटील विशेष निमंत्रित सदस्य**

✔ सुराज्य/सोलापूर









भारतीय जनता पार्टीच्यावतीने बुधवारी प्रदेश पदाधिकारी जाहीर करण्यात आले. यामध्ये सोलापूर शहरातून प्रदेश कार्यकारिणीवर माजी नगरसेवक नरेंद्र काळे यांची तर ग्रामीणमधून माजी जिल्हाध्यक्ष शंकर वाघमारे यांची जिल्हा कार्यकारिणीवर निवड केली आहे. तर भाजयुमोचे जिल्हा उपाध्यक्ष मनिष देशमुख यांची निमंत्रित तर नुकतेच भाजपात प्रवेश केलेले उदय पाटील यांची विशेष निमंत्रित म्हणून निवड करण्यात आली आहे.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्याची जम्बो कार्यकारिणी बुधवारी जाहीर केली. यामध्ये शहर आणि ग्रामीण भागाचा समतोल साधल्याचे दिसून आले आहे. यामध्ये नवीन आणि जुन्याचा मेळ घातला आहे. यामध्ये विशेष निमंत्रित म्हणून माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, के.के. पाटील (माळशिरस), माजी आ. प्रशांत परिचारक, राजेंद्र मिरगणे, राजकुमार पाटील, नुकतेच भाजपात प्रवेश केलेले उदय पाटील यांची निवड करण्यात आली आहे. तर निमंत्रित सदस्य म्हणून शहाजी पवार, गजनान भाकरे, संजय खिलारे, स्वराली बोबडे, दिपक चव्हाण, माऊली हळणवर, अनुजा कुलकर्णी, स्मिता भावे, मनिष देशमुख, नागेश वल्याळ यांची निवड करण्यात आली आहे.

# मराठा आरक्षणासाठी तुळजापूर ते मंत्रालय पायी वनवास यात्रा काढणार : केदार

✔ **सोलापूर** : मराठा समाजाला आरक्षणासाठी सकल मराठा समाजाच्यावतीने दि. ६ मे ते ६ जून दरम्यान तुळजापूर ते मंत्रालय पर्यंत मराठा आरक्षणासाठी चालत वनवास यात्रा काढण्यात येणार असल्याची माहिती योगेश केदार यांनी पत्रकार परिषदेत दिली.




छत्रपती शाहु महाराज यांच्या पुण्यतिथी दिनी ६ मे रोजी तुळजापूर येथून ही यात्रा निघेल. दररोज पहाटे ५ ते सकाळी १० पर्यंत वनवास यात्रेत चालण्यात येणार आहे. तर सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत विश्रांती घेण्यात येणार आहे. त्यानंतर पुन्हा सायंकाळी ५ ते रात्री ८ पर्यंत चालण्यात येणार असल्याचे केदार यांनी सांगितले. ही यात्रा रोज १५ कि.मी. अंतर चालेल. यात कायमस्वरुपी चालणाऱ्यांची संख्या २५० वर असेल. प्रत्येक गावात सभा, चर्चासत्र होतील. दि. ६ जूनला शिवराज्याभिषेक दिनी मोर्चा मंत्रालयावर पोहचेल आणि ठिय्या मांडेल. जोपर्यंत मराठा समाजाचा समावेश ओबीसी आरक्षणात होत नाही. तसा अधिकृत जीआर निघत नाही, तोपर्यंत लाखो मराठा बांधव मुंबईतच ठिय्या मांडून बसतील.

आरक्षण मिळेपर्यंत तिथून कोणत्याही परिस्थितीत माघार घेतली जाणार नसल्याचे केदार यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस प्रतापसिंह कांचन-पाटील, सुनील नागणे, लक्ष्मण शिरसट, राजेंद्र शिंदे, देविदास साळुंखे, अजय सौंदळे, जीवन पवार, प्रशांत कांचन - पाटील आदी उपस्थित होते.

# अक्कलकोट बाजार समिती; व्यापारी मतदारसंघातील निवडणूक गाजली

✔ सुराज्य/अक्कलकोट





अक्कलकोट व दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक जिल्ह्यात गाजली. आमदार सचिन कल्याणशेट्टी व माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्या नेतृत्वाखाली घवघवीत यश संपादन केले असून भारतीय जनता पक्षाने तालुक्यातील सहकार संस्थावर वर्चस्व पुनश्च: सिध्द केले आहे. अक्कलकोट व दुधनी बाजार समितीच्या निवडणूका यापूर्वी देखील गाजल्या.

मात्र यंदाची पंचवार्षिक निवडणूक ही आरोप-प्रत्यारोप झाले. कोणताही अनुचित प्रकार न घडता शांततेत मतदान व मतमोजणी झाली. या निवडणुकीतील मतदारसंघ निहाय मतदानाची आकडेवारी, उमेदवार याचा विचार करता सहकारी संस्था मतदारसंघातून अक्कलकोट बाजार समितीकरिता एक अपवाद वगळता सर्वच जागावर भाजपाने मोहोर उमटविली आहे तर दुधनीमध्ये सर्वच जागा भाजपाने काबीज केल्या आहेत.

ग्रामपंचायत मतदारसंघात मात्र दोन्ही बाजार समितीत मात्र काँग्रेसने या जागा काबीज केल्या आहेत. यासह व्यापारी मतदारसंघामधून दुधनी बाजार समितीत दोन जागा बिनविरोध झाल्या तर अक्कलकोट बाजार समितीच्या व्यापारी मतदारसंघात चुरशीने निवडणूक झाली. या व्यापारी मतदारसंघातून शेतकरी परिवर्तन पॅनलची पंचायत झाल्याने अपक्ष अन् शेतकरी विकास पॅनल अशी निवडणूक झाली. या निवडणुकीत अपक्ष उमेदवारास बाजार समितीतील प्रतिष्ठीत व्यापारी म्हणून घेणारे अपक्ष उमेदवार हे यशस्वी होतील अशी सर्वत्र चर्चा होती. मात्र शेतकरी विकास पॅनल मधील उमेदवार बसवराज माशाळे व श्रीशैल घिवारे यांना पॅनल टू पॅनल मतदान झाल्याने व्यापारी मतदारसंघातून दोनही उमेदवार विजयी झाले अन् बाजार समितीतील व्यापार, सौदा आमच्याशिवाय नाही असे यार्डात असलेले तथाकथित अदानी-अंबानी या व्यापाऱ्यांना भाजपाच्या या विजयी उमेदवारामुळे पराभव तर मान्य करावा लागलाच. या बरोबरच मक्तेदारी देखील मोडीत निघाल्याची चर्चा श्री बसवेश्वर मार्केट यार्डात सुरु आहे. सर्वसामान्य व्यापारी मतदारसंघातून विजयी झालेल्या बसवराज माशाळे व श्रीशैल घिवारे यांचे यार्डातून स्वागत व सत्कार होत आहे.

## निमगाव येथे विळ्याने मारहाण

✔ **सोलापूर** : निमगाव (ता. करमाळा) येथील गोरंडे गावात पोलिसात तक्रार दिल्याच्या राग धरून विळा आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत समाधान रोहिदास निळ (वय २६ रा. निमगाव) हा जखमी झाला. त्याला करमाळा येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. पदु शिंदे, शिंदे दोघांनी मारहाण केली.

## जखमी महिलेचा मृत्यू

✔ **सोलापूर** : बलसुर ते उमरगा मार्गावर टमटमच्या अपघातामध्ये जखमी झालेल्या रुक्मिणी शिवलिंग कुंभार (वय ४० रा.बलसुर ता. उमरगा) या सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना सकाळी मयत झाल्या. त्या टमटम मधून उमरगा येथे निघाल्या होत्या. त्यावेळी पाठीमागून पिकअप धडकल्याने गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांना सोलापुरात दाखल करण्यात

# आता सत्यनारायण पूजा घातली, समस्या न मिटल्यास श्राद्ध घालणार

### विस्कळीत पाणीपुरवठ्याच्या निषेधार्थ ठाकरे गटाचा महापालिकेला इशारा

✔ सुराज्य/सोलापूर

शहराला सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने थेट महापालिकेत सत्यनारायण महापूजा घालण्यात आली. शहरावरील विस्कळीत पाणीपुरवठ्याचे विघ्न दूर करण्याचे साकडे घातले. पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास श्राद्ध घालणार असल्याचा इशारा ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. या अभिनव आंदोलनाद्वारे ठाकरे गटाने विस्कळीत पाणीपुरवठ्याकडे महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधले.




सोलापूर शहरात विविध ठिकाणी पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. ही परिस्थिती गेल्या महिना-दोन महिन्यांपासून सुरू आहे. ऐन उन्हाळ्यात पाणीपुरवठ्यामध्ये अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांची प्रचंड गैरसोय आणि हाल होत आहेत. निवेदन देऊनही प्रशासनाकडून कार्यवाही होत नसल्याने अखेर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने महापालिका कौन्सिल हॉलच्या प्रवेशद्वारातच बुधवारी सकाळी थेट सत्यनारायण महापूजा घालण्यात आली. यावेळी भटजींनी विधिवत सत्यनारायण महापूजा करत मंत्र म्हटले. शहराला सुरळीत पाणीपुरवठा व्हावा असे साकडे घालण्यात आले. पूजेच्या सुरुवातीला शहर प्रमुख विष्णू कारमपुरी यांनी श्रीफळ वाढविला. यावेळी 'शहराला सुरळीत पाणीपुरवठा करा' यासह विविध घोषणा देण्यात आल्या. यावेळी पदाधिकाऱ्यांनी शासनाच्या तसेच भाजपच्या विरोधात घोषणाबाजी केली. आता सत्यनारायण पूजा घातली आहे. पाणीपुरवठ्याची समस्या न मिटल्यास श्राद्ध घालणार असल्याचा इशारा यावेळी पदाधिकाऱ्यांनी दिला.

या आंदोलनात शहर प्रमुख विष्णू कारमपुरी, उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, संतोष केंगनाळकर, शहर उत्तर समन्वयक महेश धाराशिवकर, बाळासाहेब गायकवाड, लहू गायकवाड, महिला आघाडीच्या प्रिया बसवंती आदींसह पदाधिकारी, महिला व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.